सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ३०९ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ बुधवार दि. १४ जानेवारी २०२६ ❏ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## परप्रांतियांना दोन थोबाडीत मारणं म्हणजे मुंबईचा विकास नव्हे; देवेंद्र फडणीसांचा ठाकरे बंधूंना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

मराठी माणसाचा विकास केला म्हणजे काय केलं? २५ वर्षांत मराठी माणसाला मुंबईबाहेर जावं लागलं, हा विकास नाही. परप्रांतियांना दोन थोबाडीत मारणे म्हणजे विकास नाही असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ठाकरे बंधूंना लगावला. तसेच आमचं हिंदुत्व हे पूजा पद्धतीवर अवलंबून नाही, तर प्राचीन भारतीय जीवनपद्धती माणणाऱ्यांना आम्ही हिंदू मानतो असंही ते म्हणाले.

ठाकरे बंधूंनी मराठी आणि अमराठी असा भेदभाव करत निवडणूक लढण्याचा खूप प्रयत्न केला. पण मराठी माणूस संकुचित नाही. महाराष्ट्रात क्षेत्रीय अस्मिता आहे, मराठी भाषा अभिमान आहे. कल्याण झालं पाहिजे आणि मराठी माणूस हा महाराष्ट्रात सुरक्षित असला पाहिजे असं मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलं.



प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात मुख्यमंत्र्यांनी वरळीतील बीडीडी चाळीतील नागरिकांशी संवाद साधला. त्यावेळी बीडीडी वरळीवासियांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.बीडीडीवरुन उद्धव ठाकरे आणि महायुतीत श्रेयवादाची लढाई सुरू असताना मुख्यमंत्र्यांनी बीडीडी चाळीला भेट दिली. महाराष्ट्राची जनात मोदींच्या सोबत आहे. २६ ते २७ महानगरापालिकांमध्ये भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसचा महापौर असेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**मराठी आणि हिंदू वेगळं नाही**

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्ही हिंदुत्त्व नाही विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढली. हिंदुत्व आणि विकास वेगळे होऊ शकत नाही. आमचं हिंदुत्व संकुचित नाही. आमचं हिंदुत्व हे पूजा पद्धतीवर आधारित नाही. भारतीय संस्कृती, प्राचीन भारतीय जीवनपद्धती मानणाऱ्यांना आम्ही हिंदू मानतो, आम्ही त्यांना सोबत घेऊ चालू. त्यामुळे मराठी आणि हिंदू हे वेगळे होऊ शकत नाही.

**मुंबईवर महायुतीचाच झेंडा**

महापालिका निवडणुकीतही भाजप सर्वात मोठा पक्ष होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुंबई महापालिका युती जिंकणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. तसेच पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकही महायुती जिंकणार असल्याचं फडणवीस म्हणाले.ठाकरे बंधूंच्या युतीवर पुन्हा एकदा फडणवीसांनी निशाणा साधला. ठाकरे बंधूंची युती म्हणजे प्रीतीसंगम नव्हे तर भीतीसंगम असल्याच पुनरुच्चार फडणवीस यांनी केला. तर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी पक्ष त्यांचं आस्तित्व टीकवण्यासाठी एकत्र आल्याचंही फडणवीस म्हणाले.

## मतदानाआधीच राजकीय भूकंप! बड्या नेत्याने शरद पवारांची सोडली साथ; ४२ वर्षांची निष्ठा संपुष्टात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ मुंबई**

मागच्या काही दिवसांपासून राज्यात महापालिका निवडणुकीची धामधूम सुरू आहे. आज सर्व पक्षाच्या प्रचाराच्या तोफा थंडावणार असून उद्या महापालिकेसाठी मतदान पार पडणार आहे. निवडणुकीपूर्वी आणि निवडणुकीत मोठ्या प्रमाणात राज्यामध्ये पक्षांतर पाहायला मिळाले. तिकीट न मिळणे, निष्ठावंतांना डावलून उपऱ्यांना उमेदवारी दिल्याने यंदा चांगलीच राजकीय उलथापालथ पाहायला मिळाली. तर नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीमध्ये देखील असेच काहीसे चित्र अवघ्या राज्याने बघितले.



दरम्यान या सगळ्या घडामोडींमध्ये मोठी बातमी समोर आली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाला मोठा हादरा बसला आहे. मतदानाला काही तास शिल्लक असतानाच आता बड्या नेत्याने शरद पवारांची साथ सोडल्याने राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ माजली आहे. शरद पवार यांचे ४२ वर्षांपासून असलेले खंदे समर्थक आणि माजी आमदार रमेश कदम यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाची साथ सोडली आहे. त्यांनी पक्षाच्या सदस्यस्त्वाचा राजीनामा दिला आहे. ऐन निवडणुकीत हा राजीनामा आल्याने पक्षाला मोठा धक्का बसला आहे.

रमेश कदम यांचा चिपळूण नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत पराभव झाला होता. त्यानंतर त्यांनी आपला राजीनामा दिला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रमेश कदम हे नाराज होते. पक्षात योग्य स्थान आणि सहकार्य न मिळाल्यामुळे त्यांनी शदर पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत जाधव यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला आहे. रमेश कदम हे १९८४ पासून हे शरद पवारांसोबत होते. अजित पवार यांनी केलेल्या बंड केल्यानंतर अनेक बडे नेत्यांनी साथ सोडत घडयाळ हाती घेतले मात्र रमेश कदम हे शरद पवारांसोबत होते.रमेश कदम म्हणाले, पक्षासाठी जे काही आवश्यक होते ते सर्व केले. मात्र आता पक्षात कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना किंमत उरलेली नाही तसेच १५ दिवस आराम करणार असून अजूनतरी कुठल्या पक्षात जाण्याचा निर्णय घेतला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## प्रचाराचा धुराळा शमला,उद्याला मतदान सत्तेसाठी सर्वच पक्ष आत्मविश्वासात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती**

अमरावती महापालिका निवडणुकीसाठी आता अवघ्या काही तासांवर मतदान येऊन ठेपलं आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, बहुजन समाज पार्टी, युवा स्वाभिमान यांच्यासह सर्वच प्रमुख पक्षांनी जोरदार प्रचार केला. या निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार असून यानंतर १६ डिसेंबरला अमरावती महापालिकेवर नेमका कोणाचा झेंडा फडकणार? याकडं संपूर्ण शहराचं लक्ष लागलं आहे. विशेष म्हणजे, जवळपास सर्वच पक्षांच्या नेत्यांनी आपणच बाजी मारणार आणि महापौरही आपलाच होणार असा विश्वास व्यक्त केला.



**विकास हाच केंद्रबिंदू संजय खोडके**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि विधानपरिषद सदस्य संजय खोडके यांनी पक्षाच्या विजयाचा ठाम विश्वास व्यक्त केलाय. ते म्हणाले, अमरावती महापालिकेतील ८७ जागांपैकी ८५ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असून दोन जागांवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षासोबत युती करण्यात आली आहे. प्रचाराला चांगली सुरुवात झाली. पक्षातील कोणताही उमेदवार केवळ स्वतःसाठी प्रचार करत नव्हता, तर सर्वजण एकत्रितपणे काम करत होते. प्रोफेशनल फोन कॉलचा वापर न करता चार मतदार पद्धतीनं थेट संपर्क आणि प्रभाग निहाय प्रचार करण्यात आला. प्रचारात कोणावरही टीका न करता शहर, प्रभाग आणि जिल्ह्याचा विकास तसंच सामाजिक व धार्मिक विकास हेच मुद्दे मांडले गेले. तसंच अजित पवार यांच्या अमरावती दौऱ्याचा मोठा सकारात्मक प्रभाव पडला असून विकासाशिवाय इतर कोणत्याही वादग्रस्त मुद्द्याला हात न घातल्यामुळं नागरिकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. अमरावतीचा मागासलेपणा दूर करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पुढाकार घेईल, असा विश्वास संजय खोडके यांनी व्यक्त केला.

**सुरक्षित आणि सुंदर अमरावतीसाठी पंजा – यशोमती ठाकूर**

काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांनीही काँग्रेसच बाजी मारणार असा विश्वास व्यक्त केला. त्या म्हणाल्या की, मागील सत्ताधाऱ्यांनी अमरावती शहराची अवस्था बिकट केली आहे. भूमाफिया, कचरा माफिया, गुन्हेगारी आणि अवैध ड्रग्ज यांचा वाढता प्रभाव हा सत्ताधाऱ्यांच्या अपयशाचं द्योतक आहे. काँग्रेस पक्ष एकत्रितपणे आणि शिस्तबद्ध काम करत असून शेवटच्या मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. मागील निवडणुकीपेक्षा कितीतरी पटीनं चांगली कामगिरी काँग्रेस करेल. सुरक्षित आणि सुंदर अमरावती हवी असेल तर पंजा या चिन्हावर मतदान करा, असं आवाहन यशोमती ठाकूर यांनी केलं आहे.

**भाजपाला पन्नासपेक्षा जास्त जागा – डॉ. नितीन धांडे**

भाजपाचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी भाजपा मोठी बाजी मारणार असल्याचा दावा केला आहे. ते म्हणाले, सर्व प्रभागांमध्ये जोरदार प्रचार झाला असून मिरवणुका, घराघरात जाऊन संपर्क आणि मोठ्या प्रचार सभा, यामुळं भाजपासाठी सकारात्मक वातावरण तयार झालं आहे. मागील तीन चार दिवसांत भाजपाची स्थिती अधिक भक्कम झाली असून भाजपा स्वबळावर पन्नास पेक्षा अधिक जागा जिंकण्याचा विश्वास आहे. तसंच भाजपा स्वबळावर महापालिकेत महापौर बनवेल, असा ठाम विश्वास डॉ. नितीन धांडे यांनी व्यक्त केला.

**बसपाची भूमिका निर्णायक – अजय गोंडाणे**

बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष अजय गोंडाणे यांनी पक्ष सत्तेत महत्त्वाची भूमिका बजावेल असा विश्वास व्यक्त केलाय. ते म्हणाले, बसपाचे ३२ उमेदवार निवडणूक रिंगणात असून प्रभाग क्रमांक १ १,८,९,११ आणि २२ मध्ये पक्षाची स्थिती मजबूत आहे.काही प्रभागात पक्षाचं पूर्ण पॅनल निवडून येण्याची दाट शक्यता आहे. इतर प्रभागांमधूनही एक-दोन उमेदवार विजयी होतील. विकासाच्या मुद्द्यावर जनतेकडून बसपला चांगला प्रतिसाद मिळतोय.सत्तेसाठी पक्ष मोठ्या प्रमाणात योगदान देईल, असा दावा अजय गोंडाणे यांनी केला.



## मतदानाआधीच सट्टा बाजारात 'निकाल'

### उमेदवारांची धडधड, बुकींचेही धाबे दणाणणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती**

मनपाच्या ८७ जागांसाठी होणाऱ्या मतदानाला आता अवघे काही उरले आहेत. रिंगणात असलेल्या ६६१उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होण्याआधीच सट्टा बाजारात प्रचंड तेजी पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, यंदा सट्टा बाजारात केवळ पक्षीय बहुमतावरच नाही, तर प्रभागनिहाय जागांवरही सट्टा लावला जात असल्याने चुरस अधिकच वाढली आहे.

सट्टा बाजारात केवळ महायुती किंवा महाविकास आघाडी या आघाड्यांवरच पैसे लावले जात नाहीत, तर प्रभागनिहाय कोणत्या उमेदवाराचे पारडे जड आहे, यावरही बोली लावली जात आहे.

**दोन प्रकार**

सट्टेबाजांच्या मते, मतदान झाल्यानंतर येणारी आकडेवारी निकालाचा अंदाज देण्यास सोपी जाते, त्यामुळे मतदानाआधी सट्टा लावण्याकडे कल दिसतोय सूत्रांच्या माहितीनुसार, यंदा जळगाव मनपा निवडणुकीसाठी दोन प्रकारात सट्टा लावला जात आहे. यातील गणिते पूर्णपणे 'जोखीम' आणि 'परतावा' यावर आधारित आहेत.

**हाय रिस्कवर सर्वाधिक परतावा, मतदानानंतर चन्ना होणार कमी**

मतदानापूर्वीचा 'हाय-रिस्क' सट्टा : सध्या १३ आणि १४ जानेवारी रोजी जो सट्टा लावला जात आहे, त्यावर सर्वाधिक परतावा मिळणार आहे. याचे कारण म्हणजे सध्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असून मतदारांचा कौल स्पष्ट झालेला नाही. जोखीम जास्त असल्याने, जर लावलेला अंदाज खरा ठरला, तर सट्टा लावणाऱ्याला मिळणारी रक्कम मोठी असणार आहे.

**मतदानानंतरचा 'टक्केवारी'प्रमाणे सट्टा :**

मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात मतदानाच्या टक्केवारीचा अभ्यास करून पैसे लावले जातील. मात्र, कल लक्षात येत असल्याने जोखीम कमी असते, परिणामी परतावाही कमी असेल

## माझ्याकडे भाजपच्या १०० कोटींच्या भ्रष्टाचाराची फाईल बावनकुळे म्हणाले, अजितदादा ज्या पद्धतीने बोलत सुटलेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४पुणे**

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी गुरुवारी (१४ जानेवारी) मतदान होत आहे. मात्र या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील घटक पक्ष असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रसे अजित पवार गटातील वातावरण तापताना दिसत आहे. प्रचाराचा नारळ फोडताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे महानगरपालिकेतील भ्रष्ट्राचाराचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर भाजप नेत्यांनी अजित पवारांच्या ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा मुद्दा उपस्थित केला होता. अशातच अजित पवार यांनी प्रचार संपताना माझ्याकडे भाजपच्या १०० कोटींच्या घोटाळ्याची फाईल आहे, ती काढली तर हाहाकार माजेल असा इशारा दिला आहे. दरम्यान, आता अजित पवारांच्या वक्तव्यावर महसूल मंत्री तथा भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, १९९९ ते २०२४ हा मोठा काळ आहे. १९९९ ला जेव्हा अजित पवार यांच्याकडे फाईल आली होती, तेव्हा त्यांनी अशाप्रकारचे आरोप केले असले तर त्यांची प्रामाणिक भूमिका आपण समजू शकलो असतो. मात्र, इतक्या वर्षांनी अशाप्रकारचे आरोप करणे योग्य नाही. जनता त्यांच्या अशा वक्तव्यावर कधीच विश्वास ठेवणार नाही. खरं तर अजित पवारांकडून अशी अपेक्षा नव्हती. तसेच पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या निवडणुकीमुळे ते (अजित पवार) त्रस्त झाले आहेत. महायुतीमध्ये एकत्र असताना मतभेद राहू शकतात, मात्र अशा वक्तव्यांमुळे मनभेद होणे योग्य नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, युतीच्या समन्वय समितीमध्ये जरी मी असलो, तरी अजित पवार हे वरिष्ठ नेते आहेत. परंतु अजित पवार ज्या पद्धतीने बोलत सुटले आहेत, त्यांच्याकडून अशी अपेक्षा कधीच नव्हती. दरम्यान, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याने अजित पवार असं वक्तव्य करत आहेत का? असा प्रश्न विचारला असता चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, अजित पवारांना दोन्ही राष्ट्रवादी एक करायची आहे की नाही, हा निर्णय त्यांनी घ्यायचा आहे. यावर अधिकृत घोषणा होईल तेव्हा तेव्हा अधिक चर्चा करू, अशी भूमिका चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केली.

## महाराष्ट्रातील पुढील काही तास महत्त्वाचे वारे आणि तुरळक पावसाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्राभर सध्या हवामानाची चंचलता पाहायला मिळत आहे. मुंबईत थंडीचा जोर काहीसा कमी झाला असला तरी हवेत गारवा वाटत आहे. सकाळी आणि रात्री थंड वातावरण, तर दुपारी अचानक तापमान वाढल्याने उष्णता जाणवायला सुरुवात झाली आहे. राज्यातील अनेक भागांत हा तापमानातील तफावत नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये तापमानात लक्षणीय घट नोंदवली जात आहे. काही ठिकाणी गारठ्याची परिस्थिती असून थंडीचा कडाका जाणवत आहे. दरम्यान, हवामान खात्याने पुढील ७२ तास महाराष्ट्रासाठी महत्त्वाचे असल्याचा इशारा दिला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने दक्षिण भारतातील काही भागांत जोरदार वारे आणि पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. याचा परिणाम महाराष्ट्रावरही होण्याची शक्यता आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात पावसाची शक्यता नसली, तरी ढगाळ वातावरण, जोरदार वारे आणि काही ठिकाणी तुरळक पावसाच्या सरी कोसळू शकतात, असे हवामान खात्याने स्पष्ट केले आहे. मकर संक्रांतीपर्यंत हवामानात फारसा बदल होणार नसल्याचा अंदाज आहे. थंडीची तीव्र लाट नसली तरी गारवा कायम राहणार आहे. मात्र मकर संक्रांतीनंतर तापमानात हळूहळू वाढ होऊन थंडीचा प्रभाव कमी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, सांगली जिल्ह्यात रविवारी रात्री अवकाळी पावसाने हजेरी लावली. कडाक्याच्या थंडीने गारठलेल्या सांगलीकरांना अचानक झालेल्या पावसाचा अनुभव घ्यावा लागला. रात्री रिमझिम पावसामुळे वातावरणात गारवा वाढला असून महापालिका निवडणुकीच्या प्रचारावरही त्याचा परिणाम झाला. याआधी मुंबई आणि पुण्यातही काही भागांत पावसाच्या हलक्या सरी पडल्या होत्या. सतत बदलणाऱ्या हवामानामुळे राज्यभरात सर्दी, ताप यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढताना दिसत असून नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन हवामान खात्याने केले आहे.

## घरोघरी जाऊन प्रचार करण्याच्या तरतूदीसंदर्भातील आदेश जुनाच

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

महानगरपालिका निवडणूकांच्या प्रचाराची समाप्ती झाल्यानंतर घरोघरी जाऊन प्रचार करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने कुठलाही नवीन आदेश निर्गमित केलेला नाही. त्यासंदर्भातला आदेश जुनाच असून तो राज्य निवडणूक आयोगाने १४ फेब्रुवारी २०१२ मध्येच निर्गमित केलेला आहे.

जाहीर प्रचाराच्या समाप्तीनंतर घरोघरी जाऊन प्रचार करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने नवीन नियम लागू केला असल्याचे वृत्त समाजमाध्यमांसह विविध माध्यमातून प्रसारित होत आहे; परंतु हे वस्तुस्थितीला धरुन नाही. याबाबतचा आदेश जुनाच आहे. त्या १४ फेब्रुवारी २०१२ रोजीच्या आदेशानुसार जाहीर प्रचार समाप्तीनंतर उमेदवार हे मतदान केंद्राच्या १०० मीटर बाहेर मतदारांना भेटून आणि घरोघरी जाऊन प्रचार करु शकतील.

## निवडणूक आयोग ईव्हीएम मशीनला 'पाडू' नावाचे नवीन डिव्हाइस जोडणार; राज ठाकरेंच्या आरोपाने नव्या वादाला फोडणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ मुंबई**

राज्याच्या राजकारणात आज एक मोठी खळबळ उडाली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी 'शिवतीर्थ' निवासस्थानी तातडीची संयुक्त पत्रकार परिषद घेऊन भारतीय निवडणूक आयोगावर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. निवडणूक आयोग पारदर्शक राहिलेला नाही, ते सत्ताधाऱ्यांचे गुलाम झाले आहेत, अशा शब्दांत राज ठाकरे यांनी संताप व्यक्त केला.

राज ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत खळबळजनक दावा केला की, निवडणूक आयोग इव्हीएम मशीनला एक नवीन 'डिव्हाइस' (उपकरण) जोडणार आहे. या तांत्रिक बदलाबाबत आयोगाने कोणत्याही राजकीय पक्षाला विश्वासात घेतलेले नाही किंवा तशी पूर्वकल्पना दिलेली नाही. हे नवीन मशीन नेमके दिसते कसे, याचे काम काय आणि ते ऐनवेळी का जोडले जात आहे, याचे उत्तर आयोगाकडे नाही, असे राज ठाकरे म्हणाले.

## संपादकीय ......

# मकर संक्रांतीचा सांगावा

कॅलेंडरीय नववर्षामध्ये येणारा पहिला सण म्हणजे मकर संक्रांत. मकर संक्रांतीचा सण म्हणजे भारतीय संस्कृतीतील चैतन्याचा आणि मांगल्याचा एक आगळावेगळा उत्सव होय. हिवाळ्याच्या कडाक्याच्या थंडीत निसर्ग निस्तब्ध झालेला असताना सूर्याचे उत्तरायण सुरू होते आणि मकर संक्रांतीचे आगमन होते. खगोलशास्त्र, आरोग्यशास्त्र आणि सामाजिक सौहार्द यांचा एक अपूर्व संगम म्हणून या सणाकडे पाहिले जाते. भारतीय पंचांगानुसार मकर संक्रांत दरवर्षी साधारणपणे १४ किंवा १५ जानेवारीलाच येते. याचे गणित सौर स्थितीवर आधारित असते. सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो, तेव्हा त्याला मकर संक्रांत असे संबोधले जाते.

मकर संक्रांतनिमित्ताने होणारे सूर्याचे हे संक्रमण सर्वदूर उत्साहात साजरे केले जाते. या दिवसापासून दिवस मोठा होऊ लागतो आणि रात्र लहान होऊ लागते. थंडीच्या दिवसात मानवी शरीरातील जठराग्नी प्रदीप्त झालेला असतो आणि शरीराला अधिक उष्णतेची गरज असते. अशावेळी निसर्गाचा समतोल राखण्यासाठी तीळ आणि गूळ यांसारख्या स्निग्ध पदार्थांचे सेवन करण्याची परंपरा पूर्वजांनी अत्यंत विचारपूर्वक आखली आहे. तीळ हे उष्ण गुणधर्माचे असतात आणि त्यामध्ये मुबलक प्रमाणात तेल असते, तर गूळ हा शरीरातील ऊर्जा टिकवून ठेवण्यास मदत करतो. या दोन्ही घटकांच्या मिश्रणातून शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि हिवाळ्यातील कोरड्या हवेपासून त्वचेचे संरक्षण होते. कोणतेही शुभ कार्य उत्तरायणात करावे, असा एक संकेत आहे. एक सण आणि एक पुण्यपर्व म्हणून मकर संक्रातीला फार महत्त्व आहे. उत्तरायणाचा आरंभदिन म्हणून संक्रातीला अयन संक्रांत असेही नाव आहे.

मकर संक्रांतीला मकर संक्रांतदेवीची पूजा केली जाते. हे देवीचे रौद्ररूप आहे. ही देवी एखाद्या वाहनावर बसून येते. वाहनासोबत ती अवस्था, शस्त्र, अलंकार आणि वस्त्रही बदलते. बदलते वाहन आणि सोबतच्या वस्तू काही घटनांच्या सूचक मानल्या जातात. मकर संक्रांतदेवी ज्या दिशेकडून येते तेथे समृद्धी मिळते. ज्या दिशेकडे जाते तेव्हा ती तिसऱ्याच दिशेकडे पाहते. ती ज्या दिशेकडे जाते आणि पाहते त्या दिशेकडे संकटे येतात, असे मानतात.

उत्तर भारतात या दिवशी डाळ-भात यांची खिचडी बनवली जाते. हिला संक्रांत खिचडी असेही म्हटले जाते. बंगालमध्ये काकवीत तीळ घालून तिळुआ नावाचा पदार्थ, तसेच तांदळाच्या पिठात तूप-साखर घालून केलेला पिष्टक नावाचा पदार्थ बनवतात. बंगालमध्ये संक्रांतीला तिळुआ संक्रांत किंवा पिष्टक संक्रांत म्हणतात. कोकणात इडली आणि नारळाच्या रसात गूळ घालून तयार केलेले पदार्थ खातात. देशावर गुळाच्या पोळीचे महत्त्व असते. तिळगूळ देऊन परस्पर स्नेहसंबंध दृढ केले जातात. या सणाच्या निमित्ताने नवी सून, जावई, लहान मुलं यांचं खास कौतुक केलं जातं. संक्रांतीच्या निमित्ताने नव्या सुनेला हलव्याच्या दागिन्यांनी सजवून तिचं विशेष कौतुक केलं जातं. जावयालाही हलव्याची अंगठी, फेटा आणि इतर भेटवस्तू देण्याची प्रथा आहे. त्याचबरोबर लहान मुलांचं बोरन्हाण करून त्यांच्या अंगावर हलव्याचे आकर्षक दागिने घालण्याची पद्धत आहे.संक्रांतीला विशेषत्वाने काळ्या रंगाचे महत्त्व अनन्यसाधारण मानले गेले आहे. याद्वारे लोकांच्या मनातील काळ्या रंगाची अभद्रता दूर केली आहे. संक्रांतीनिमित्त वाटला जाणारा तिळगूळ हा मनातील सारे दुःख, नकारात्मकता, किलमिषे दूर सारून नात्यांमधील गोडवा वाढीस लावतो. मनाचे बंध जोडतो. यातून तणाव निवळतात आणि आनंदाचे नवे पर्व सुरू होते. हाच खरा संक्रांतीचा संदेश आहे.

# राजकमल उड्डाणपुलाची टाळेबंदी

## अमरावतीकरांच्या संयमाचा अंत की राजकीय षडयंत्र?



शहराच्या हृदयाचे ठोके मानल्या जाणाऱ्या राजकमल चौकातील रेल्वे उड्डाणपूल गेल्या अनेक महिन्यांपासून वाहतुकीसाठी बंद आहे. जो पूल शहराच्या एका टोकाला दुसऱ्या टोकाशी जोडायचा, तोच आता सामान्यांच्या त्रासाचे आणि राजकीय उदासीनतेचे केंद्र बनला आहे. मात्र, याहीपेक्षा गंभीर बाब म्हणजे अमरावती रेल्वे स्थानक शहराबाहेर हलवण्याच्या हालचाली आणि महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर सर्वच राजकीय पक्षांनी या विषयावर धारण केलेले 'मौनी बाबा'चे व्रत!विकासाचा पूल की त्रासाचा सापळा?राजकमल उड्डाणपूल बंद असल्याने बस स्थानक, इर्विन चौक आणि जयस्तंभ चौकावर वाहतुकीचा प्रचंड ताण पडत आहे. रुग्णवाहिकांना रस्ता मिळत नाही, व्यापाऱ्यांचा व्यवसाय ठप्प झाला आहे आणि नोकरदार वर्गाचा तासनतास वेळ वाहतूक कोंडीत जात आहे. पुलाच्या दुरुस्तीचे काम तांत्रिक कारणांमुळे रखडले आहे की त्यामागे काही वेगळेच गणित आहे, असा प्रश्न आता सर्वसामान्य अमरावतीकर विचारू लागला आहे.रेल्वे स्थानक स्थलांतराचा डाव?पुलाच्या दुरुस्तीसोबतच सध्या पडद्यामागे हालचाली सुरू आहेत त्या अमरावती रेल्वे स्थानक शहराबाहेर हलवण्याच्या. जर रेल्वे स्थानक शहराच्या बाहेर गेले, तर शहराच्या मध्यवस्तीतील ही मोकळी होणारी जागा कुणाच्या घशात जाणार? हा खरा कळीचा मुद्दा आहे. रेल्वे स्थानक लांब गेल्यास सामान्य प्रवाशांचे हाल होतील, रिक्षा-टॅक्सी चालकांचा रोजगार धोक्यात येईल आणि अमरावतीची ओळख पुसली जाईल, याची भीती व्यक्त होत आहे.निवडणुका तोंडावर, पण नेते गप्प का?आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत एरवी गल्लीपासून दिल्लीपर्यंतचे विषय काढणारे राजकीय पक्ष या मुद्द्यावर मात्र 'मूग गिळून' बसले आहेत.सत्ताधारी तांत्रिक कारणांचे दाखले देत वेळकाढूपणा करत आहेत.विरोधक केवळ फोटोसेशनपुरते आंदोलन करून शांत होत आहेत.नेत्यांचे मौन बरेच काही सांगून जाते. या विषयावर बोलल्यास कोणाचे हितसंबंध दुखावले जातील, ही भीती की या मौनामागे काही 'सेटलमेंट' आहे?अमरावतीकरांचा सवालराजकमल पुलाचे काम युद्धपातळीवर का पूर्ण केले जात नाही? रेल्वे स्थानक स्थलांतरित करण्याच्या हालचाली कुणाच्या फायद्यासाठी सुरू आहेत? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, महापालिका निवडणुकीत मते मागताना लोकप्रतिनिधी या प्रश्नांची उत्तरे देणार का?वेळ आली आहे की, अमरावतीच्या जनतेने आता केवळ आश्वासनं नाही, तर ठोस कृतीची मागणी करावी. अन्यथा, हा बंद पूल केवळ सिमेंटचा सांगाडाच नाही, तर लोकशाहीतील मेलेल्या संवेदनशीलतेचे प्रतीक ठरेल.



**– श्रीकांत खोरगडे**

# उशीजवळ मोबाइल ठेवून झोपणे कितपत सुरक्षित?



**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या डिजिटल युगात मोबाइल फोन आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मोबाइल हातात असतो.




अनेक जण तर रात्री झोपताना मोबाइल थेट बेडवर, उशीजवळ किंवा डोक्याच्या बाजूला ठेवून झोपतात. काहींना अलार्मसाठी मोबाइल जवळ हवा असतो, तर काही जण झोपण्याआधी सोशल मीडिया, व्हिडिओ किंवा चॅट पाहण्याची सवय ठेवतात. मात्र, तज्ज्ञांच्या मते अशी सवय आरोग्यासाठी हळूहळू घातक ठरू शकते.

आजच्या डिजिटल युगात मोबाइल फोन आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मोबाइल हातात असतो. अनेक जण तर रात्री झोपताना मोबाइल थेट बेडवर, उशीजवळ किंवा डोक्याच्या बाजूला ठेवून झोपतात. काहींना अलार्मसाठी मोबाइल जवळ हवा असतो, तर काही जण झोपण्याआधी सोशल मीडिया, व्हिडिओ किंवा चॅट पाहण्याची सवय ठेवतात. मात्र, तज्ज्ञांच्या मते अशी सवय आरोग्यासाठी हळूहळू घातक ठरू शकते.

डॉक्टर सांगतात की, रात्री झोपताना मोबाइल जवळ ठेवल्यामुळे सर्वात मोठा परिणाम झोपेच्या गुणवत्तेवर होतो. मोबाइलमधून निघणारी ब्लू लाईट मेंदूतील मेलाटोनिन हार्मोनचे उत्पादन कमी करते. हे हार्मोन आपल्याला शांत झोप येण्यासाठी आवश्यक असते. त्यामुळे उशीजवळ मोबाइल ठेवून झोपल्यास झोप उशिरा लागणे, वारंवार जाग येणे किंवा अपुरी झोप होण्याच्या समस्या वाढतात.याचा थेट परिणाम मानसिक आरोग्यावरही होतो. अपुरी झोप झाल्यास चिडचिड, तणाव, चिंता आणि नैराश्याची लक्षणे वाढू शकतात. अनेक जण सकाळी उठल्यावर थकवा, डोकेदुखी किंवा अस्वस्थता जाणवते, अशी तक्रार करतात. यामागे रात्री मोबाइल जवळ ठेवण्याची सवय एक कारण ठरू शकते.

# मकर संक्रातीला बनवा आरोग्य आणि चवीला उत्तम असलेली तिळगुळ बर्फी

## अशी आहे रेसिपी


तिळगुळाची बर्फी

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**

तिळगूळ बर्फी ही चविष्ट तर आहेच, पण ती पौष्टिकतेचा खजिनाही आहे. विशेषतः हिवाळ्यात शरीराला उष्णता आणि ऊर्जा देणारा हा पदार्थ आरोग्यासाठी उपयुक्त ठरतो. संक्रांतीसह संपूर्ण हिवाळ्यात तिळगूळ बर्फी आरोग्य आणि चवीचा उत्तम संगम ठरतो.

तिळगूळ बर्फी ही खूप चविष्ट आणि पौष्टिक मिठाई आहे, जी तीळ व गुळापासून बनवली जाते. हिवाळ्यात शरीराला उबदारपणा देते. तिळगूळ बर्फी चवीला उत्कृष्ट लागते आणि ती बनविण्याची प्रक्रियाही सोपी असते, ज्यात भाजलेले तीळ आणि शेंगदाणे गुळाच्या पाकात मिसळून बर्फीच्या स्वरूपात सेट केली जाते.

पदार्थ बनविण्यासाठी लागणारे साहित्य

पांढरे तीळ, गूळ (किसलेला), तूप, वेलदोड्याची पूड, बदाम/काजू (बारीक चिरलेले), दूध आदी साहित्य लागतात.

पदार्थ बनविण्याची कृती

कढईत तीळ मंद आचेवर हलके गुलाबी रंग येईपर्यंत भाजून घ्या.

ते थंड झाल्यावर मिक्सरमधून थोडे जाडसर दळून घ्या.

त्याच कढईत तूप घालून किसलेला गूळ मंद आचेवर वितळवून घ्या.

गूळ पूर्णपणे वितळल्यावर त्यात वेलदोड्याची पूड घाला.

आता त्यात दळलेले तीळ घालून मिश्रण एकत्र करा. मिश्रण खूप कोरडे वाटल्यास दूध घाला.

मिश्रण घट्ट होईपर्यंत सतत ढवळा. तूप लावलेल्या थाळीत हे मिश्रण पसरवून वरून बदाम-काजू भुरभुरा.

थंड झाल्यावर हव्या त्या आकाराचे बर्फीचे तुकडे कापावे.

आरोग्यदायी फायदे

तीळ व गूळ दोन्हीही उष्ण गुणधर्माचे असल्याने हिवाळ्यात शरीर गरम ठेवण्यास मदत करतात.

गुळामध्ये लोह (आयरन) मुबलक प्रमाणात असते. त्यामुळे हिमोग्लोबिन वाढण्यास मदत होते आणि ॲनिमियाचा धोका कमी होतो.

तिळांमध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम व फॉस्फरस असल्याने हाडे व दात मजबूत राहतात.

गूळ पचनसंस्थेस चालना देतो, बद्धकोष्ठता दूर करतो आणि आतड्यांची स्वच्छता राखतो.

# कमी खर्चात कमी कालावधीत चांगल उत्पादन देणारी दोडका, कारले शेती, वाचा सविस्तर


सद्यस्थितीतील दोडका, कारले लागवड

***दि.१४विदर्भ प्रजासत्ताक***

*दोडका आणि कारल्याची शेती फायदेशीर असून त्यासाठी योग्य जमीन, बियाणे प्रक्रिया, खत व्यवस्थापन आणि मंडप पद्धतीचा वापर आवश्यक आहे. योग्य अंतरावर बियाणे टाकून, बीजप्रक्रिया करून आणि संतुलित खतांचा वापर केल्यास चांगले उत्पादन मिळते.*

***वेलवर्गीय भाजीपाला पिके : दोडका, कारले लागवड***

*वेलवर्गीय भाजीपाला पिके : दोडका, कारले लागवड*

*आमच्या न्यूजलेटरसाठी साईन-अप करा*

*एरळश्र -ववीर्शीी*

*चांगला निचरा होणाऱ्या, भुसभुशीत, मध्यम ते भारी जमिनीची निवड करावी.*

*लागवडीपूर्वी शेताची चांगली मशागत करून एकरी ६ टन चांगले कुजलेले शेणखत मिसळावे.*

*उन्हाळी लागवड जानेवारी ते मार्च महिन्यात करावी.*

***लागवडीसाठी दोडक्याच्या पुसा नसदार, कोकण हरिता, फुले सुचिता;** कारल्याच्या फुले प्रियांका, फुले ग्रीन गोल्ड, फुले उज्वला, हिरकणी, कोकण तारा या सुधारित जातींची निवड करावी.*

*तसेच बाजारामध्ये खाजगी कंपन्यांचे विविध उत्पादनक्षम वाण उपलब्ध आहेत.*

*कारले आणि दोडका लागवडीसाठी ताटी पद्धतीचा अवलंब करावा.*

*पारंपरिक पद्धतीपेक्षा या सुधारित पद्धतीमुळे उत्पादनात वाढ मिळते. लागवडीचे अंतर १.५ ् १ मीटर ठेवावे.*

*लागवडीसाठी दोडका, कारले या पिकाचे सुधारित वाणांचे ६०० ते ८०० ग्रॅम बियाणे लागते.*

*सेच बाजारामध्ये खाजगी कंपन्यांचे विविध उत्पादनक्षम वाण उपलब्ध आहेत.*

*कारले आणि दोडका लागवडीसाठी ताटी पद्धतीचा अवलंब करावा.*

*पेरणीपूर्वी बियाण्यास २.५ ग्रॅम कार्बेडाझिम प्रति किलो या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.*

*माती परीक्षण अहवालानुसार रासायनिक खतांची मात्रा द्यावी.*

*– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन सेवा केंद्र, इगतपुरी*

# शेतकऱ्याला अधिकाऱ्याने चक्क बुटाने केली मारहाण

## अनुदानाबाबत विचारल्याने आला राग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ वाशिम-** मंगरुळपीर (वाशिम): तालुक्यातील गोगरी परिसरात मनरेगा योजनेंतर्गत संत्रा फळबागेचे अनुदान रखडल्याबाबत विचारणा करणाऱ्या शेतकऱ्याला तालुका कृषी अधिकाऱ्याने बुटाने व मातीच्या ढेकळाने मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. गोगरी येथील शेतकरी ऋषिकेश पवार यांनी दोन वर्षांपूर्वी मनरेगा योजनेंतर्गत तीन एकर क्षेत्रावर संत्रा फळबाग लावली होती. या फळबागेसाठी शासनाकडून मिळणारे अनुदान चार महिन्यांपासून रखडल्याचा त्यांचा आरोप आहे. दरम्यान, मंगरुळपीरचे तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे हे गोगरी शिवारात पाहणीसाठी गेले असता, पवार यांनी त्यांच्याकडे अनुदानाबाबत विचारणा केली. आरोपानुसार, जाब विचारत असताना तालुका कृषी अधिकाऱ्याने शेतकऱ्याच्या अंगावर धाव घेत बुटाने मारहाण केली. याशिवाय, मातीची ढेकळे उचलून मारल्याचा आरोप करण्यात आला आहे.

> एक व्यक्ती महिला कर्मचाऱ्याच्या अंगावर धावली. तो संबंधित शेतकरीही नव्हता. परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला. मी अंगावर धावलो असलो, तरी मारहाण अजिबात केलेली नाही. माझ्यावरील आरोप पूर्णतः खोटे आहेत
>
> **– सचिन कांबळे,** तालुका कृषी अधिकारी.



**तुला गुन्ह्यात अडकवतो अशी दिली धमकी** – या घटनेनंतर संबंधित अधिकाऱ्याने शेतकऱ्याला 'तुला गुन्ह्यात अडकवीन' अशी धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. घटनेची माहिती परिसरात पसरताच शेतकरी संघटनांचे पदधिकारी व स्थानिक शेतकऱ्यांनी तीव्र निषेध नोंदविला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी तालुक्यातील शेतकरी संघटनांनी केली आहे. तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे यांनी शेतकरी ऋषिकेश पवार यांना बुटाने मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल होत असून, त्यामध्ये शेतकऱ्याला बुटाने मारहाण होत असल्याचे दृश्य दिसत असल्याचा दावा केला जात आहे.

# बळजबरीने धर्मांतरासाठी पत्नीचा छळ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती-** ब्राह्मणवाडा थडी पोलीस ठाणे हद्दीतील ३४ वर्षीय विवाहितेला पतीने जबरदस्ती धर्मांतर करण्यास सांगत मानसिक व शारीरिक छळ केल्याची घटना समोर आली आहे. पत्नीच्या तक्रारीवरून पोलिसांनी ५० वर्षीय पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ३४ वर्षीय तक्रारदार महिला व आरोपी यांच्यात पूर्वी प्रेमसंबंध होते. त्यानंतर दोघांनी नोंदणीकृत विवाह केला. पती हा वेगळ्या धर्माचा असून तो सतत पत्नीला 'तुला माझ्या धर्माच्या रीतिरिवाजांनुसार राहावे लागेल, तुला धर्मांतर करावे लागेल,' अशी धमकी देत मानसिक व शारीरिक छळ करत होता. या सततच्या त्रासाला कंटाळून महिलेने ब्राम्हणवाडा थडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १४ जानेवारी २०२६

शहर/ग्रामिण

# महापालिका निवडणुकीचा प्रचार थांबला

## उमेदवारांचा आता गाठीभेटींवर जोर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती–** मनपा निवडणुकीसाठी ३ जानेवारीपासून जाहीर प्रचार सुरू झाला. या काळात अनेक ठिकाणी सभा झाल्या. त्यात प्रामुख्याने मुख्यमंत्री फडणवीस यांचा रोड शो तर उपमुख्यमंत्रीद्वय एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या समावेश आहे. या शिवाय अन्य नेत्यांच्याही सभा झाल्या. वातावरण चांगलेच ढवळून निघाले. २२ प्रभागामध्ये दररोज सकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत विविध उमेदवारांचा प्रचार सुरू होता. भोंगे व स्पिकरच्या माध्यमातून उमेदवरांचा होणार्या



प्रचाराने शहरातली प्रत्येक गल्ली आणि चौक दणाणून गेला होता. जाहीर प्रचाराच्या मंगळवारी शेवटच्या दिवशी जवळपास सर्व प्रभागातल्या प्रमुख पक्षाच्या उमेदवारांनी भव्य प्रचार फेरी काढून शक्ती प्रदर्शन केले. त्यात भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, काँग्रेस, बसपा, वंचित बहुजन आघाडी, युवा स्वाभिमान या पक्षाचा प्रामुख्याने समावेश होता. मतदारांनी या रॅलींचे बारकाईने निरीक्षण केले.

भाजयुमोच्यावतीने नेहरू मैदान येथून भाजपाच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य रॅली काढली. या रॅलीत खा. अनिल बोंडे, भाजयुमोचे अध्यक्ष विक्की शर्मा व अन्य पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते. विविध प्रभात निघालेल्या भाजपाच्या प्रचार रॅलीमध्ये जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे, माजी खा. नवनीत राणा, माजी मंत्री प्रवीण पोटे, निवडणूक प्रमुख जयंत डोहनकर, प्रवक्ता शिवराय कुळकर्णी, किरणताई महल्ले, किरण पातुरकर, रवींद्र खांडेकर यांच्यासह अन्य नेत्यांनी सहभाग घेतला होता. काँग्रेसकडून माजी मंत्री सुनील देशमुख, यशोमती ठाकूर यांच्यासह अन्य नेते सहभागी झाले होते. रवि राणा यांनी युवा स्वाभिमान पार्टीच्या उमेदवारांचा प्रचार केला. आता जनता कोणाला कौल देते हे पाहावे लागेल.

# धामणगाव रेल्वे न.प. उपाध्यक्षपदी गिरीश मुंधडा यांची बिनविरोध निवड

## नगराध्यक्ष अर्चना अडसड यांच्या अध्यक्षतेखाली घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४धा.रेल्वे**

धामणगाव रेल्वे नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी गिरीश (बंडू) पुखराज मुंधडा यांची बिनविरोध निवड झाली आहे. नगराध्यक्ष अर्चना अडसड (रोठे) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. ही निवड मंगळवारी, १३ जानेवारी रोजी पार पडली.



नवनिर्वाचित नगरसेवकांची पहिली बैठक नगरपालिका सभागृहात घेण्यात आली. याच बैठकीत डॉ. असित पसारी आणि ड. रीना मनोज व्यास यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून घोषणा करण्यात आली.

उपाध्यक्षपदी निवड झालेले गिरीश मुंधडा हे सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात सक्रिय सहभाग घेणारे व्यक्ती आहेत. ते गोरक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, श्रीराम शिक्षण संस्थेचे संचालक आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक आहेत. त्यांच्या अनुभवामुळे नगर परिषदेत समतोल आणि विकासाभिमुख नेतृत्वाला बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या निवड बैठकीला मुख्याधिकारी पूनम कळंबे, कार्यालय अधीक्षक प्रतिभा डोंगरे, गट नेते नरेंद्र चौधरी, नगरसेवक डॉ. हेमकरण कांकरीया, गोपाल द्विवेदी, रवि कुकरेजा, मुरलीधर पतके, दर्शन राठी, जगदीश राय, विलास बूटले, अंशुल बडगैया, मंजिरी भोगे, प्रतिभा खोब्रागडे, मनिषा शिरभाते, रीना साहू, रंजना शेलोकार, सीमा बागडे, प्रियंका जवंजाळ, काजल उपरीकर, सीमा पेंदाम, अंजली मार्वे, स्वच्छता निरीक्षक आकाश सोनेकर, लेखापरीक्षक रत्नेश खडसे, प्रशासकीय अधिकारी विनोद अंबाडकर, कर व प्रशासकीय अधिकारी पंकज इंगळे, नगर अभियंता शेखर ढबाले, कनिष्ठ अभियंता प्रदीप सहारे आदी उपस्थित होते.

# उपाध्यक्ष निवडणुकीत काँग्रेस, भाजपला प्रत्येकी ३ जागा

## प्रहार, राकाँ (श.प.) ला प्रत्येकी एक जागा; ४ ठिकाणच्या निवडणुका बाकी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती–** अमरावती जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगरपंचायत उपाध्यक्षपदाच्या मंगळवार, १३ जानेवारी रोजी पार पडलेल्या निवडणुकीत काँग्रेस आणि भाजपला प्रत्येकी तीन जागांवर विजय मिळाला आहे. एकूण १२ स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी आतापर्यंत आठ ठिकाणच्या निवडणुका पूर्ण झाल्या आहेत. यापैकी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) आणि माजी मंत्री बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेला प्रत्येकी एक जागा मिळाली आहे. उर्वरित चार ठिकाणच्या निवडणुका पुढील तीन दिवसांत होणार आहेत.



यापूर्वी २१ डिसेंबर रोजी नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांचे निकाल जाहीर झाले होते. त्यावेळी जिल्ह्यात सहा नगराध्यक्षपदी भाजप, दोन ठिकाणी काँग्रेस आणि प्रत्येकी एका ठिकाणी शिवसेना (शिंदे गट), प्रहार, वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना (उबाठा गट) यांनी यश मिळवले होते. उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीतही तेच चित्र कायम ठेवण्याचे मोठे आव्हान संबंधित राजकीय पक्षांसमोर होते.

> **आठ नगरपालिकांमध्ये निवडून आलेले उपाध्यक्ष आणि त्यांचे पक्ष असे आहेत**
>
> **दर्यापूर: अहमदखा शादत खाँ (काँग्रेस)**
> **धारणी: खान आशाबी अकबर खान (काँग्रेस)**
> **नांदगाव खंडेश्वर: अब्दुल जमीर अ. रहीम (काँग्रेस)**
> **धामणगाव रेल्वे: गिरीश पुखराजजी मुंधडा (भाजप)**
> **चांदूर रेल्वे: प्रमोद हरगोविंद वानरे (भाजप)**
> **शेंदुरजना घाट: सुनिता जीवन वंजारी (भाजप)**
> **मोर्शी: डॉ. प्रदीप शामराव कुऱ्हाडे (राकाँ श.प.)**
> **चांदूर बाजार: अब्दुल रेहेमान शेख इब्राहिम (प्रहार)**

आजच्या निकालांवरून हे आव्हान सर्वच ठिकाणी पेलता आले नाही, हे स्पष्ट झाले आहे. बहुतेक नगरपालिकांमध्ये नगरसेवकांचे प्राबल्य दुसऱ्याच पक्षाकडे गेल्याने, उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाच्या विरोधातील उमेदवारांना यश मिळाले आहे. भाजपला धामणगाव रेल्वे आणि शेंदुरजनाघाटमध्ये नगराध्यक्षांसोबतच उपाध्यक्षपदही राखता आले, तर प्रहारने चांदूर बाजार येथे यश मिळवले.

दोन दिवसांपूर्वी झालेल्या निवडणुकीत दर्यापूरमध्ये काँग्रेसने नगराध्यक्षपदासोबतच उपाध्यक्षपदही जिंकले होते.

मात्र इतर ठिकाणचे चित्र वेगळे आहे. नांदगाव खंडेश्वर येथे अध्यक्षपद शिवसेना (उबाठा गट) कडे असताना उपाध्यक्षपद काँग्रेसकडे आले आहे. चांदूर रेल्वेमध्ये अध्यक्षपद वंचित बहुजन आघाडीकडे तर उपाध्यक्षपदावर भाजपने ताबा मिळवला आहे.

धारणीमध्ये भाजपचे नगराध्यक्ष असले तरी उपाध्यक्षपद काँग्रेसच्या वाट्याला गेले आहे. मोर्शीमध्ये नगराध्यक्षपद शिवसेना (शिंदे गट) कडे असताना उपाध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटाकडे गेले आहे.

# दर्यापूर न.प. सभापती पदे: काँग्रेसला बिनविरोध; पाचही समित्यांवर वर्चस्व

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती**

दर्यापूर नगरपरिषदेच्या विविध विषय समितीच्या सभापतीपदाची निवडणूक मंगळवार, १३ जानेवारी रोजी पालिका सभागृहात पार पडली. नगराध्यक्ष मंदाकिनी भारसाकळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत ही निवड जाहीर करण्यात आली. या निवडणुकीत सभापतींची पाचही पदे काँग्रेसच्या वाट्याला बिनविरोध आली आहेत.



सभापतीपदांसाठी अर्ज दाखल करण्याची वेळ दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत होती. प्रत्येक पदासाठी केवळ एकच अर्ज आल्याने, पिठासीन अधिकारी डॉ. धीरजकुमार गोहाड यांनी सर्व अर्ज स्वीकारून उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

त्यानुसार, सार्वजनिक बांधकाम सभापतीपदी प्रवीणा नितीन गावंडे, आरोग्य व स्वच्छता सभापतीपदी हबीब खान असद उल्ला, शिक्षण सभापतीपदी वर्षा मनोज बोरेकर आणि महिला व बालकल्याण सभापतीपदी मंदा दादा इंगळे यांची निवड झाली.

नियोजन व स्थायी समितीचे सभापतीपद हे पदसिद्ध असून ते उपाध्यक्षांकडे असते. त्यामुळे अहमद खा शादत खा यांची त्या पदासाठी निवड झाली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या मंगला राजेश तराळ यांची महिला व बालकल्याण समितीवर उपसभापती पदावर वर्णी लागली आहे.नवनियुक्त सभापतींचे नगराध्यक्ष मंदाकिनी भारसाकळे, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे आणि सर्व उपस्थित सदस्यांनी अभिनंदन केले. या सभेला पीठासीन अधिकारी म्हणून मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड, सहाय्यक पिठासीन अधिकारी डॉ. विकास खंडारे, अधीक्षक सुमेध खिराडे आणि सहाय्यक प्रदीप दानडे उपस्थित होते.

# चांदुर रेल्वे न.प. उपाध्यक्षपदी भाजपचे प्रमोद वानरे विजयी

## काँग्रेस उमेदवाराला एका मताने हरवले, स्वीकृत सदस्यही निवडले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४चा. रेल्वे–** चांदुर रेल्वे नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी भाजपचे प्रमोद वानरे एका मताच्या फरकाने विजयी झाले आहेत. मंगळवार, १३ जानेवारी रोजी झालेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेसचे उमेदवार अरिहंत गेडाम यांचा पराभव केला. यासोबतच निलेश विश्वकर्मा आणि डॉ. सुभाष पनपालिया यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली.



नवनिर्वाचित अध्यक्ष प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. उपाध्यक्षपदासाठी भाजपतर्फे बच्चू उर्फ प्रमोद वानरे आणि काँग्रेसतर्फे अरिहंत गेडाम रिंगणात होते. पीठासीन सभापतींनी हात उंचावून मतदान घेण्याचे निर्देश दिले.

या मतदानात नगराध्यक्षांच्या मतासह अरिहंत गेडाम यांना १० मते मिळाली. तर, भाजप एकसंघ राहिल्याने बच्चू उर्फ प्रमोद वानरे यांना ११ मते मिळाली. त्यामुळे प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांनी प्रमोद वानरे यांना उपाध्यक्ष म्हणून घोषित केले.

यानंतर स्वीकृत सदस्यांच्या नावांचीही घोषणा करण्यात आली. भाजपचे गटनेते म्हणून पप्पू उर्फ निलेश भालेराव आणि काँग्रेसचे गटनेते म्हणून हाजी मोहम्मद अनीस सौदागर यांच्या नावांचीही यावेळी घोषणा झाली. मतदान प्रक्रियेमध्ये मुख्याधिकारी सुप्रिया टवलारे यांच्यासह न.प. कर्मचारी रुपेश नानवटकर, जितेंद्र खवसे, उमेश ढेरे आणि विशाल तुर्तकर यांनी सहायक म्हणून कामकाज पाहिले.

चांदुर रेल्वेच्या २० सदस्यीय सभागृहात भाजपचे सर्वाधिक ११ सदस्य आहेत. काँग्रेसचे ५, आपलं चांदूरचे (वंचित बहुजन आघाडी) दोन, अपक्ष दोन आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा एक नगरसेवक आहे. निवडणुकीपूर्वी भाजप आणि काँग्रेस वगळता इतर चार नगरसेवकांनी एक गट तयार केला होता.

उपाध्यक्षपदाच्या निवडीवेळी या गटासोबतच नगराध्यक्षांनीही काँग्रेसला कौल दिला होता. त्यामुळे गेडाम यांना १० मते मिळाली. मात्र, भाजप एकसंध राहिल्याने त्यांना एका मताच्या फरकाने पराभव पत्करावा लागला.

# शेंदुरजनाघाटच्या उपाध्यक्षपदी भाजपच्या सुनिता वंजारी

## दोन स्वीकृत सदस्यांचीही घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४शे.घाट–** शेंदुरजनाघाट नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदी भाजपच्या सुनिता वंजारी यांची बिनविरोध निवड झाली आहे. मंगळवार, १३ जानेवारी रोजी झालेल्या या निवडणुकीत त्या अविरोध विजयी झाल्या. याच बैठकीत दोन स्वीकृत सदस्यांचीही घोषणा करण्यात आली.

नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेवकांची पहिली सभा मंगळवारी नगरपालिका सभागृहात पार पडली. उपाध्यक्षपदासाठी संदीप बाबाराव खडसे आणि सुनिता जीवन वंजारी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र, माघारीच्या वेळी संदीप खडसे यांनी आपला अर्ज मागे घेतल्याने, सुनिता वंजारी यांचा एकमेव अर्ज कायम राहिला आणि त्यांची बिनविरोध उपाध्यक्ष म्हणून घोषणा करण्यात आली.

दरम्यान, स्वीकृत नगरसेवक पदासाठी भारतीय जनता पक्षाकडून निलेश अण्णा फुटाणे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) वतीने विशाल सावरकर यांची निवड करण्यात आली. मुख्याधिकारी गजानन भोयर यांनी या बैठकीत सहायक निवडणूक अधिकारी म्हणून कामकाज पाहिले.



नगराध्यक्ष तथा पिठासीन सभापती सुवर्णा वरखेडे यांच्या अध्यक्षतेखाली ही सर्वसाधारण सभा पार पडली. संख्याबळानुसार दोन स्वीकृत नगरसेवकांची निवड करायची होती. सत्ताधारी पक्षाला स्पष्ट बहुमत असल्याने भाजपच्या वतीने निलेश फुटाणे, तर विरोधी पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) वतीने विशाल सावरकर यांची निवड झाली. भाजपचे गटनेता म्हणून प्रशांत सावरकर आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) गटनेते म्हणून संदीप खडसे यांच्या नावावरही शिक्कामोर्तब झाले. शेंदूरजनाघाट नगरपरिषदेत भाजपचे ११, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ६, शिवसेना (शिंदे गट) २ आणि १ अपक्ष असे पक्षीय बलाबल आहे.

# मोर्शी नगर उपाध्यक्षपदी डॉ. प्रदीप कुऱ्हाडे अविरोध

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या(शरद पवार गट) नेत्याची एकमताने निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४मोर्शी–** मोर्शी नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे डॉ. प्रदीप कुऱ्हाडे यांची अविरोध निवड झाली आहे. या पदासाठी ते एकमेव उमेदवार असल्याने त्यांची निवड बिनविरोध झाली.

नगराध्यक्षा प्रतीक्षा रवी गुल्हाने यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची पहिली सभा पार पडली. यावेळी मुख्य अधिकारी शिवदास मुसळे आणि प्रशासकीय अधिकारी अमोल ढोले यांनी सहायक अधिकारी म्हणून कामकाज पाहिले.

याच बैठकीत तीन स्वीकृत सदस्यही निवडायचे होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चा एक उमेदवार अस्वीकृत झाल्याने एक पद रिक्त ठेवण्यात आले. उर्वरित दोन स्वीकृत सदस्यांपैकी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सय्यद रियाज सय्यद हमजा यांची अविरोध निवड झाली. भारतीय जनता पक्षातर्फे ड. जयंत ढोले, ज्योतीप्रसाद मालवीय आणि सरिता सचिन उमाळे यांनी अर्ज दाखल केले होते. भाजपाच्या गटनेत्या प्रीती ब्रह्मानंद देशमुख यांनी सरिता उमाळे यांच्या नावाला स्वीकृती दिल्याने त्यांची दुसऱ्या स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.



या बैठकीत विविध पक्षांचे गटनेतेही जाहीर करण्यात आले. भाजपाच्या गटनेत्या म्हणून प्रीती ब्रह्मानंद देशमुख, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या गटनेत्या म्हणून राखी गौरव खेरडे, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) गटनेतेपदी डॉ. प्रदीप कुऱ्हाडे यांची नियुक्ती करण्यात आली.

या सभेत सर्व २४ नगरसेवक उपस्थित होते. त्यांनी एकमताने डॉ. प्रदीप कुऱ्हाडे यांच्या उपाध्यक्षपदाच्या नियुक्तीस मान्यता दिली. यावेळी नगरपरिषदेचे कर्मचारी, पत्रकार तसेच मोर्शी शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# प्रचाराची रणधुमाळी थांबली, आता मतदान करण्याची जबाबदारी अमरावतीकरांची - भारत गणेशपुरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती :** अमरावती महानगरपालिका निवडणुकीत ८७ जागांसाठी एकूण ६६१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. आता निवडणूक प्रचाराची रणधुमाळी थांबली असून अमरावतीकरांनी मोठ्या संख्येनं मतदान करण्यासाठी घराबाहेर पडावं. मतदानाचा टक्का वाढवावा, असं आवाहन मंगळवारी (१३ जानेवारी) अमरावती महापालिकेचे ब्रँड म्बेसिडर अभिनेते भारत गणेशपुरे यांनी केलं.

मतदान हे कर्तव्य : १५ जानेवारीला अमरावती महापालिकेकरिता अमरावतीकरांना मतदान करायचा आहे. सगळ्यांनी



सकाळी मतदान केंद्रावर जाऊन स्वच्छ प्रतिमा असणाऱ्या चांगल्या उमेदवाला मतदान करावं. आपल्या परिसराचा विकास व्हावा, आपला परिसर स्वच्छ असावा, यासाठी मतदानाच्या माध्यमातून स्वच्छ उमेदवाराला मतदान करा, असं भारत गणेशपुरे यांनी सांगितलं. तसंच, अमरावतीच नव्हे तर महाराष्ट्रात ज्या ज्या भागात महापालिकेची निवडणूक होत आहे, त्या सर्वच ठिकाणी नागरिकांनी मोठ्या संख्येनं मतदान करण्यासाठी बाहेर पडावं, असंही भारत गणेशपुरे यांनी म्हटलं आहे.

**भारत गणेशपुरे यांची प्रतिक्रिया**

प्रचाराचा आजचा शेवटचा दिवस : मंगळवारी महापालिका निवडणूक प्रचाराचा अखेरचा दिवस असल्यानं सकाळी आठ वाजल्यापासून जवळपास सर्वच प्रभागांमध्ये विविध पक्षाच्या उमेदवारांनी मिरवणूक काढून शक्तीप्रदर्शन केलं. शहरातील सर्वच पक्षाचे नेते आज विविध प्रभागात मिरवणुकीमध्ये सहभागी झालेत. अनेक भागात पदयात्रा निघाली तर काही ठिकाणी दुचाकीवर मिरवणूक काढण्यात आली.

**उमेदवारांकडून जोरदार शक्तीप्रदर्शन**

**अमरावतीत ८७ जागांसाठी ६६१ उमेदवार :** अमरावती महापालिका निवडणुकीत एकूण २२ प्रभागात ६६१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. २२ पैकी २१ प्रभागात एकूण चार उमेदरांना निवडून द्यायचं आहे, तर केवळ वडाळी प्रभागात तीन उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

## पक्षाचे एकूण उमेदवार

| | |
|---|---|
| भाजपा : ६८ | आंबेडकरवादी रिपाइं: १ |
| काँग्रेस : ७४ | आम आदमी पार्टी : ८ |
| राष्ट्रवादी काँग्रेस : ८५ | इंडियन युनियन मुस्लिम लीग : २ |
| शिवसेना (उबाठा): ४१ | ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक : ७ |
| शिवसेना : ६७ | एआयएमआयएम : २५ |
| वंचित बहुजन आघाडी : ४७ | देश जनहित पक्ष : १ |
| बहुजन समाज पार्टी : ३४ | राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष : १४ |
| युवास्वभिमान पार्टी : ३६ | पीपल्स पार्टी ऑफ इंडिया : ३ |
| मनसे : ४ | प्रहार जनशक्ती पक्ष : ३ |
| रिपाई गवई गट : ४ | भारतीय कम्युनिस्ट पक्ष : ३. |
| रिपाई आंबेडकर गट : ३ | |
| समाजवादी पार्टी : ६ | |

# संक्रांत कोणावर अन् वाण कोणाला मिळणार?

## पैजा लागल्या, कुंडल्या बघून निकालावर अंदाज

**अमरावती महापालिका निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात रंगल्या पैजा**




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती-** ऐन संक्रांतीच्या सणालाच निवडणुकांचा माहोल गरम झाला आहे. अनेक प्रभागात चुरशीच्या लढती रंगल्याने कोण जिंकणार अन् कोण हरणार याचा अंदाज लावणे कठीण होत आहे. तरीही संक्रांत कोणावर येणार अन् विजयाचे वाण कोणाच्या हाती पडणार यावरून अमरावती महापालिका क्षेत्रात पैजा रंगल्या आहेत. पैजांमध्ये पैसे, वाहने, मोबाईल डावावर लागले आहेत. अमरावती महापालिकेच्या एकूण २२ प्रभागात ८७जागांसाठी निवडणूक होत आहे. यंदा ६६१ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. यंदा पक्षांची संख्याही खूप असल्याने लढतींचे चित्र रंगतदार बनले आहे. पहिल्या टप्प्यात कोणताही अंदाज लागणे शक्य नव्हते. आता प्रचाराचा शेवटचा टप्पा सुरु असल्याने राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांमध्येही निकालावरून पैजा लावल्या जात आहे.निवडणुका म्हटलं की पैजा आल्याच. पैजा म्हटलं की हार-जीत आलीच. निवडणुकीत जिंकणाऱ्या उमेदवाराबाबत अंदाज व्यक्त करीत पैजांचे विडे उचलले जात आहेत. नगरपालिका निवडणुकीतही छुप्या व जाहीर पैजा लावण्यात आल्या होत्या. निकालानंतर त्याची पूर्तता काही ठिकाणी करण्यात आली, आता

**कशाकशावर पैजा लागल्या ?**

प्रभागात कोणत्या गटात कोण विजयी होणार यापासून कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार यावर पैजा लागल्या आहेत. सर्वाधिक पैजा या विजयी व पराभूत उमेदवार कोण असेल यावर लागल्या आहेत. महापालिकेत सत्ता कोणाची येणार यावर लागलेल्या पैजांची संख्या कमी आहे. रकमांच्या स्वरुपातील पैजांचे प्रमाण अधिक दिसून येते.

**गतवेळी अंदाज चुकले**

मागील निवडणुकीत भाजपला अनपेक्षित यश मिळाल्याने अनेकांचे अंदाज चुकले होते. यंदा अनेक पक्ष मैदानात उतरल्याने व सर्वांनी ताकद लावल्याने महापालिकेत सत्ता कोणाची येणार यावरील अंदाज फारसे व्यक्त होताना दिसत नाहीत. त्यामुळे उमेदवारांवरच अधिक अंदाज वर्तविले जात आहेत.

**कुंडल्या बघून अंदाज**

काही उमेदवारांनी कुंडल्या दाखवून निकालाबाबत अंदाज घेतला असल्याने निकटवर्तीय कार्यकर्त्यांनी त्या आधारावरही पैजा लावण्यास सुरुवात केली आहे. महापालिका निवडणुकीतही निकालाची उत्सुकता लागली असताना अंदाजांची जागा पैजांनी घ्यायला सुरुवात झाली आहे.

# नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत उपाध्यक्षपदी महाविकास आघाडीचे अब्दुल जमीर

## स्वीकृत सदस्यपदी मो. साजिद व अविनाश ब्राह्मणवाडे यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ नांदगाव खंडेश्वर**
नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतच्या उपाध्यक्ष पदासाठी आज झालेल्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे (राका शरद पवार गट ) चे अब्दुल जमीर शेख रहीम १३ मते घेऊन विजयी ठरले उपाध्यक्षपदासाठी भाजपाकडून अक्षय पारस्कर यांचा उमेदवारी अर्ज तर महाविकास आघाडी कडून अब्दुल जमील शेख रहीम यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता . मतदान प्रक्रियेनंतर भाजपाचे अक्षय पारस्कर यांना ५ मते मिळाली तर अब्दुल जमीर शेख रहीम यांना तब्बल १३ मते मिळाल्याने ते नगरपंचायतच्या उपाध्यक्षपदी विजयी ठरले. महाविकास आघाडीमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या पक्षांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे नगर पंचायतमधील दोन स्वीकृत सदस्य पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली.त्यामध्ये नगर विकास आघाडीकडून मो. साजिद मो.शब्बीर यांची निवड करण्यात आली. दुसर्या स्वीकृत सदस्य पदासाठी अविनाश ब्राम्हणवाडे आणि काँग्रेसचे उमेदवार डॉ.शोएब यांच्यात थेट लढत झाली.दोन्ही उमेदवारांना समान पाच-पाच मते मिळाल्याने



नियमानुसार ईश्वर चिठ्ठी काढण्यात आली.या ईश्वर चिठ्ठीत अविनाश ब्राम्हणवाडे यांचे नाव निघाल्याने ते विजयी ठरले त्यांची स्वीकृत सदस्यपदी निवड जाहीर करण्यात आली. ही निवड जाहीर होताच महाविकास आघाडी व नगर विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी शहरातून विजयी मिरवणूक काढत जल्लोष केला. यावेळी कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत फटाक्यांची आतषबाजी केली.

नगर विकास,नागरिकांच्या मूलभूत सुविधा,स्वच्छता,पाणीपुरवठा व शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व सदस्य एकत्रितपणे काम करणार असल्याचे मत नव्याने निवडून आलेल्या पदाधिकार्यांनी व्यक्त केले. यावेळी पिठासीन अधिकारी नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर व मुख्य अधिकारी निवृत्ती भालकर यांनी निवडणुकीचे कामकाज सांभाळले.

नगर अभियंता करण सयाम, आशिष ढवळे ,संजय चौधरकर, प्रमोद राऊत इतर कर्मचारी उपस्थित होते. सभागृहात शिवसेना उबाठा चे नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर, नगरसेवक प्रकाश मारोटकर, वासुदेव लोखंडे, प्रीती इखार, कांता लोमटे व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अब्दुल जमीर अब्दुल रहीम, रजिया बी अब्दुल सलाम ,आशिया समीर शेख, काँग्रेसचे जोशना धवसे, प्रांजली गुल्हाने, मोहम्मद रियाज, अलमास बी ,शीला वाडेकर तसेच भाजपाचे अक्षय पारस्कर, संजय पोफळे ,योगेश चव्हाळे ,राका अजित पवार गटाचे छकुली गेडाम, प्रहार चे वैभव कोंडवते या सदस्यांची उपस्थिती होती.

# शहरात १५ व १६ जानेवारीला वाहतुकीमध्ये अंशत: बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती-**
महानगरपालिका अमरावती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ मतमोजणी दि. १६ जानेवारी २०२६ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख, क्रीडा व वाणिज्य संकुल, महानगरपालिका, नवसारी, अमरावती येथे सकाळी १० वाजेपासून सुरू होणार आहे. तत्पुर्वी दि. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान प्रक्रिया आटोपल्यानंतर मतदान केंद्रावरील इव्हीम मशीन, कंट्रोल युनीट इत्यादी सामुग्री घेवून येणार्या वाहनांची वर्दळ मतमोजणी केंद्र परिसरात मोठ्या प्रमाणात राहणार आहे. तसेच दि. १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी प्रक्रियेसाठी सकाळी ८ वाजेपासून संबंधित अधिकारी, उमेदवार, मतमोजणी प्रतिनिधी महानगरपालिका क्रीडा संकुल, नवसारी, अमरावती परिसरात मतमोजणीसाठी दाखल होतील. मतमोजणी प्रक्रीयेसाठी मोठ्या संख्येने येणार शासकीय व खाजगी नागरिक यांची व वाहनांची वर्दळ लक्षात घेता मतदान केंद्र परिसरात वाहतुक कोंडी, अपघात यासारखा प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. सर्व सामान्य नागरिकांचे जीवित रक्षण व कायदा व सुव्यवस्था हाताळण्यासाठी मतमोजणी केंद्र परिसरासमोरील मार्गावरील वाहतुक बंद करून इतर मार्गाने वळविण्यात येणार आहे. पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी मुंबई पोलीस कायदा तसेच मोटर वाहन कायदा अन्वये हा आदेश जारी केला आहे **प्रवेश बंदी**




**मार्ग-** कठोरा ते छत्रपती संभाजी राजे चौक राजपूत धाबा चौक पर्यंत. कालावधी- गुरूवार दि. १५ जानेवारी २०२६ चे रात्री १० वाजेपासून शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ चे संपूर्ण मतमोजणी प्रक्रीया संपेपर्यंत राहील. याला पर्यायी मार्ग- पंचवटीकडून नवसारीकडे जाणार्या सर्व वाहनांनी कठोरा नाका रंगोली लॉन-कठोरा जकात नाका या पर्यायी मार्गाचा वापर करावा. राजपूत धाबाकडून पंचवटीकडे येणार्या सर्व वाहनांनी पर्यायी मार्ग-राजपूत धाबा-रिंगरोड-पोटेपाटील चौक-कठोरा नाका फक्त किंवा राजपूत धाबा-रिंगरोड-पोटे पाटील चौक- रहाटगाव टी पॉईंट या मार्गाचा अवलंब करावा.

अत्यावश्यक वेळी जनहित लक्षात घेता सहायक पोलीस आयुक्त वाहतुक अमरावती शहर यांना कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून नियोजित अधिसूचनेमध्ये वाहतुकीच्या नियमनाबाबत अंशत: बदल करण्याचे अधिकार राहील.

# १६.३३ लाखांचे दागिन्यासह रोख रक्कमेची चोरी

## मुलीला भेटण्यासाठी अमेरिकेला जाणे ठरले महाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती-**
गाडगेनगर पोलीस ठाणे हद्दीतील डॉक्टर कॉलनीतील रहिवाशाला आपल्या मुलीला भेटण्यासाठी अमेरिकेला जाणे महागात पडले. त्यांच्या अनुपस्थितीत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आलमारीतून सोन्याचे दागिने, चांदीची भांडी तसेच रोकड असा एकूण १६ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सतीश रामचंद्र बोंडे यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सतीश बोंडे हे २३ डिसेंबर २०२५ रोजी घराला कुलूप लावून आपल्या मुलीला भेटण्यासाठी अमेरिकेला गेले होते. काही दिवस तेथे राहून ते १० जानेवारी रोजी परत आले. घरी आल्यानंतर समोरील दरवाजाचे कुलूप उघडून घरात प्रवेश केला असता मागील खोलीत सर्व साहित्य अस्ताव्यस्त अवस्थेत आढळले. आलमारी उघडी असल्याचेही त्यांच्या निदर्शनास आले. चोरट्यांनी आलमारीतील लॉकरमधून ८५ ग्रॅम सोन्याचे दागिने (किंमत सुमारे ७ लाख रुपये), ३० ग्रॅमचे मंगळसूत्र (९२ हजार रुपये), २० ग्रॅम डोरले मणी (८० हजार रुपये), २१ ग्रॅम कडा (२ लाख ७१ हजार रुपये), २.५० ग्रॅम कानातील झुमके (१५ हजार रुपये), ३ ग्रॅमची अंगठी (३० हजार रुपये), २५ ग्रॅम सोन्याचे नाणे (४६ हजार रुपये), ३२ ग्रॅम गळ्यातील चैन (१ लाख रुपये), १० ग्रॅमची अंगठी (२८ हजार रुपये), २६७ ग्रॅम चांदीची भांडी (६९ हजार रुपये) तसेच रोकड १ लाख ५० हजार रुपये असा एकूण १६ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या प्रकरणी सतीश बोंडे यांनी ११ जानेवारी रोजी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## नांदगावात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती-** नांदगाव पेठ येथील माळीपुरा मध्ये राहणार्या एका तरुणाने सोमवारी रात्री दारूचा नशेमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना आज मंगळवार १३ जानेवारीच्या सकाळी समोर उघडकीस आली आहे. अमोल वासुदेवराव राऊत (वय ३५) असे आत्महत्या करणार्या तरुणाचे नाव आहे. माहितीनुसार अमोल राऊत एमआयडीसी परिसरमध्ये कार्यरत होता. गेल्या दोन महिन्यापूर्वी त्याला नोकरीवरून काढण्यात आले होते. तेव्हापासून तो मानसिक तणावात होता. यामुळे त्याला दारूचे व्यसन जडले.

# धारणी नगरपंचायतमध्ये काँग्रेसचा उपाध्यक्ष

## आशाबी खान बहुमताने पदारुढ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४धारणी-** नगरसेवक असलेल्या धारणी नगर पंचायतच्या उपाध्यक्षा पदावर मंगळवारी काँग्रेसच्या आशाबी अकबर खान निवडून आल्याने पुन्हा मेळघाटच्या राजकारणाने कलाटणी घेतल्याने खळबळ माजलेली आहे. अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीत भाजपाचे सुनील चौथमल निवडून आल्यानंतर नगरसेवका च्या निवडणुकीत खंडीत जनादेश आलेला असताना माजी आमदार राजकुमार पटेल यांनी दोन मतांचा जुगाड करुन भाजपापा डीवचले आहे. १३ जानेवारी रोजी असलेल्या उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवार आशाबी खान या भाजपाचे प्रतिक मालवीय यांना पराभूत करुन निवडून आल्या. मालवीय यांना ७ तर आशाबीला १० मते मिळाली. तिसरे उमेदवार सूरज मालवीय यांना एक मत मिळाले. अखंडीत जनादेशाप्रमाणे काँग्रेस ८, भाजपा ४, शिवसेना १, राष्ट्रवादी १ तर तीन नगरसेवक अपक्ष म्हणून विजयी झालेले होते.मंगळवारी न. पं. कार्यालयात मुख्याधिकारी विजय लोहकरे यांच्या उपस्थितीत निवडणूक पार पडली. अध्यक्षांना धरुन भाजपाकडे ७ मते होती तर काँग्रेसकडे १० मते. आशाबीची निवड होताच काँग्रेसने न. पं.त आपले वर्चस्व सिद्ध करुन दाखविले. राजकुमार पटेल यांच्या नेतृत्वात विजयी जल्लोष साजरा करण्यात आला. विजयी मिरवणूक काढण्यात आली. काँग्रेसच्या या विजयाचे शिल्पकार ठरले रोहित पटेल, पंकज मोरे, गोलू खान, राजा खान, सै. खालीद, नगरसेवक मिना मोहोड, संतोष चौबे, डॉ. शैलेश जिराफे, स्वीकृत सदस्य राजकिशोर मालवीय, अनिता पाखरे, मलिक शेख, शे. मुख्तार, राजकुमार मालवीय, हेराम मालवीय, महेंद्र मालवीय, काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष महेंद्र गैलवार, विनोद वानखडे यांनी प्रयत्न केले. आता सभापतीच्या निवडणुकीवर लक्ष लागलेले आहे.

# ग्रामपंचायतीचा कारभार ढेपाळला, बऱ्याच ठिकाणी पाइपलाइन लिकेज:नागरीकांवर ओढवली दूषित पाणी पिण्याची वेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अंजनगाव बारी**

अंजनगाव बारी येथील जुनी पाईपलाईन अनेक ठिकाणी लिक झाल्यामुळे नागरिकांना गढूळ व दुषित पाणी पुरवठा होत आहे. ही अडचण गेल्या काही महिन्यांपूर्वी निर्माण झाली. त्यामुळे गावातील सजग नागरिक तसेच काही संस्था-संघटनांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे तक्रारीही केल्या. मात्र अद्याप कोणतीही दुरुस्ती करण्यात आली नाही. परिणामी नागरिकांवर दुषित पाणी पिण्याची वेळ उद्भवली आहे.



अंजनगाव बारी येथे नळांद्वारे घरपोच पाणी पुरवले जाते. परंतु गेल्या काही दिवसांपासून घरगुती नळांद्वारे गढूळ व दुषित पाण्याचा पुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. यासंदर्भात गेल्या चार महिन्यांपूर्वीच ग्रामपंचायतीला येथील नागरीकांनी लेखी तक्रारी दिली. मात्र अद्याप कोणतेच पाऊल उचलले गेले नाही. एका पाहणीनुसार वार्ड क्रमांक ३ मध्ये बऱ्याच ठिकाणी पाईप लाईन लिक झाली आहे. परंतु ग्रामपंचायत प्रशासनाने डोळेझाक चालविली आहे. गावामध्ये बऱ्याच ठिकाणी घरगुती नळांना पुरेशा प्रमाणात पाणी येत नाही, अशीही काही नागरिकांची तक्रार आहे. गावकऱ्यांच्या मते प्रशासनातील आधिकारी काम चुकारपणा करित आहेत. जलस्वराज्य-२ ही योजना कार्यान्वीत झाली तेव्हा पाणी पुरवठा सुरळीत होता. मात्र गेल्या ५ वर्षात पाण्याची टंचाई जाणवायला लागली.

**नळ येण्याच्या वेळेमध्ये व दिवसांमध्ये अनियमतता होत गेली**

गटविकास अधिकारी व ग्रामविकास अधिकारी ग्राम प्रशासनाचे मुख्य सुत्रधार असून त्यांचे नियंत्रण ढासळल्याचा आरोपही केला जात आहे. त्यामुळे अमरावतीच्या गट विकास अधिकाऱ्यांनी याची दखल घेऊन त्वरेने स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठ्याची सोय करावी, अशी मागणी पुढे आली आहे. याबाबतची लेखी तक्रार संताजी जगनाडे तैलिक समितीचे अध्यक्ष गणेश नवखरे, उपाध्यक्ष सौरभ भांडे, सचिव रोशन जुमळे यांनी ग्रामप्रशानाला दिली आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाने खर्च करावा गावात पाणीपट्टीची वसुली ५० टक्केच झाली आहे. वसुली कमी होत असल्याने प्रशासनावर ताण येतो. उत्पन्न कमी आणि खर्च अधिक असे होऊ नये, यासाठी प्रशासनाला खर्चात काटकसरही करावी लागते. परंतु पाणी हा अत्यंत महत्वाचा विषय असल्याने त्यावर ग्रामपंचायत प्रशासनाने खर्च करायलाच हवा.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पातून शेतकऱ्यांना अनुदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४वरुड**

वरुड तालुक्यातील कृषी क्षेत्रासाठी अभिमानास्पद अशी कामगिरी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत नोंदविण्यात आली आहे. गाव बारगाव, तालुका वरूड येथील शेतकरी मधुकर तुकाराम यावलकर यांना ठिबक सिंचन संचासाठीचे अनुदान त्यांच्या बँक खात्यावर जमा झाले असून, ते राज्यस्तरावर द्वितीय क्रमांकाचे लाभार्थी ठरले आहेत. यामुळे वरूड तालुक्याचे नाव राज्यात उजळले आहे. अमरावती जिल्ह्यातील कृषी विभागाच्या वेगवान आणि शिस्तबद्ध प्रयत्नांमुळे हा यशस्वी अनुभव शक्य झाला आहे सदर लाभ प्रकरणात दिनांक ८ जानेवारीला ठिबक सिंचन संचाची मोका तपासणी कृषी विभागामार्फत करण्यात आली होती. तपासणी पूर्ण होताच कोणतीही तांत्रिक अडचण न ठेवता अवघ्या २४ तासांच्या आत म्हणजेच ९ जानेवारीला अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्याच्या खात्यावर वर्ग करण्यात आली. सामान्यतः अनुदान वितरणास उशीर लागतो, मात्र, या प्रकरणात कृषी विभागाने वेगवान, नियोजनबद्ध व




पारदर्शक कार्यवाही करून आदर्श निर्माण केला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत उपविभागीय कृषी अधिकारी उज्वल आगरकर यांच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली अनुदान प्रकरणांचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यांच्या सूचनांनुसार शेतकऱ्यांच्या अर्जांची तांत्रिक तपासणी, मोका अहवाल आणि प्रस्ताव सादरीकरण अत्यंत काटेकोर व वेळेत पूर्ण करण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान मिळण्यात कोणताही विलंब झाला नाही. तसेच वरूड तालुका कृषी अधिकारी रेहान मुजावर व त्यांच्या टीम ने विशेष तत्परता दाखवत सर्व प्रशासकीय प्रक्रिया जलद गतीने पूर्ण केल्या. यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांचे समन्वय पूर्ण काम, डिजिटल प्रणालीचा योग्य वापर आणि शेतकरी-केंद्रित दृष्टिकोन महत्त्वाचा ठरला. परिणामी, शेतकऱ्यांना आधुनिक ठिबक सिंचन प्रणालीचा लाभ वेळेत मिळू शकला. ठिबक सिंचनामुळे पाण्याचा कार्यक्षम व काटकसरीने वापर होऊन सिंचन खर्चात मोठी बचत होते. तसेच पिकांना आवश्यक तेवढेच पाणी व खत मिळाल्याने उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होते. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा मुख्य उद्देशच शाश्वत शेती, पाण्याचे संवर्धन आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा असून, या प्रकरणातून तो प्रत्यक्षात साध्य होत असल्याचे दिसून येते. यासंदर्भात तालुका कृषी अधिकारी वरूड रेहान मुजावर यांनी वरूड तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना आवाहन केले आहे.

# राज्यस्तरीय उत्कर्ष स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या चमुची कामगिरी

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

अमरावती महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्षाद्वारे राज्यस्तरीय उत्कर्ष - सामाजिक व सांस्कृतिक महोत्सवामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या चमूने उत्कृष्ट कामगिरी करीत संकल्पना नृत्य, समुहगान व उत्कृष्ट कार्य भित्तीचित्र अहवाल या कलाप्रकारामध्ये तीन पारितोषिके प्राप्त केली आहेत. विद्यापीठाच्या चमूने केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व चमू व व्यवस्थापकांचा सत्कार केला. या महोत्सवामध्ये महाराष्ट्रभरातील २२ विद्यापीठांमधून ३०४ स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. त्यात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित




महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावतीचा गजानन पळसकर, जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूरचा सार्थक गावंडे, अभिषेक धर्मे, हर्षल गवई, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकालचा अभिषेक कातव, जिजामाता महाविद्यालय, बुलडाणाचा संकेत बागडे, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळचा तुषार उके, आर.ए. कॉलेज वाशिमचा महेश राठोड व ऋषिकेश कोंडाणे, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड मॅनेजमेंट बडनेराची आर्या जामोदकर, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीची जान्हवी शेटे, श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जीची तृप्ती खरात, श्री. आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोलाची यशिका प्रांजळे, पायल भगत, विज्ञान महाविद्यालय, मलकापूरची वृषाली गायकवाड, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणीची ऋतुजा रामगीरवार, बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुसदची राजेश्वरी गजरे, ब्राजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची नियती काळे असे १८ स्वयंसेवक, तर चमू व्यवस्थापक म्हणून जिजामाता महाविद्यालय, बुलडाणाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. गजानन लोहटे सहभागी झाले होते.

# जिल्ह्यातील थकबाकीदार शासकीय कार्यालये महावितरणच्या रडारवर

## २२ जानेवारीला एकाच वेळी वीज पुरवठा खंडित (‘टोकन डिस्कनेक्शन’) ची कारवाई;




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

जिल्ह्यात वीजबिलाची कोट्यवधी रुपयांची थकबाकी असलेली शासकीय व सार्वजनिक सेवा देणारी कार्यालये आता महावितरणच्या थेट कारवाईच्या रडारवर आली आहेत. वारंवार सूचना, स्मरणपत्रे,प्रत्यक्ष पाठपुरावा आणि नोंदणीकृत मोबाईलवर मेसेज करूनही वीजबिल भरण्यास प्राधान्य न दिल्याने महावितरणने कठोर भूमिका घेतली असून, येत्या २२ जानेवारी रोजी एकाच वेळी सर्व थकबाकीदार शासकीय कार्यालयांचा चार तासांसाठी वीजपुरवठा खंडित (टोकन डिस्कनेक्शन) करण्यात येणार आहे.

मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी शासकीय कार्यालयांना तातडीने थकबाकी भरून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. वीजबिलाची वसुली ही केवळ आर्थिक बाब नसून, त्यावरच महावितरणचे अस्तित्व आणि सेवा अवलंबून असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**कर्मचाऱ्यांवर वीजबिल वसूलीचे ताण**

कर्मचाऱ्यांना वीजबिलाच्या वसूलीबाबत विचारण होते किंबहुना त्यांना वसूलीसाठी जबाबदारही धरल्या जाते.महावितरणकडून अनेक वेळा लेखी पत्रव्यवहार, स्मरणपत्रे व प्रत्यक्ष संपर्क करूनही जिल्ह्यातील अनेक शासकीय कार्यालयाची थकबाकी भरण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे. सामान्य ग्राहकांकडून थकबाकी राहिल्यास तत्काळ कारवाई केली जाते, मग शासकीय कार्यालयांना सवलत का, असा सवालही उपस्थित होत आहे. शासकीय थकबाकीमुळे महावितरण कर्मचाऱ्यांवरही वसुलीबाबत अतिरिक्त ताण येत असल्याचे चित्र आहे.

**शासकीय कार्यालयांकडे २१९ कोटी ७५ लाख थकीत**

जिल्ह्यातील प्रशासकीय व सार्वजनिक सेवा देणाऱ्या ७,४१७ शासकीय कार्यालयांकडे एकूण २१९ कोटी ७५ लाख ५१ हजार रुपये वीजबिलाची थकबाकी आहे. यामध्ये अमरावती शहरातील १,११३ कार्यालये, अचलपूर, अंजनगाव, चिखलदरा, दर्यापूर, धारणी तालुक्यातील २,४३७ कार्यालये,भातकूली, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे, तिवसा तालुक्यातील २,४६७ आणि चांदूर बाजार, मोर्शी, वरूड, शेंदुरजना घाट तालुक्यातील १,४०० कार्यालयांचा समावेश आहे.

**पूर्व सूचना म्हणून ४ तास वीज पुरवठा खंडित करण्याची ( टोकन डिस्कनेक्शन ) कारवाई**

जिल्ह्यातील सर्व थकबाकीदार शासकीय कार्यालयांवर २२ जानेवारीला एकाच दिवशी आणि एकाच वेळी ‘टोकन डिस्कनेक्शन’ची कारवाई करण्यात येणार आहे. या अंतर्गत संबंधित कार्यालयांचा वीजपुरवठा तब्बल चार तासांसाठी खंडित करण्यात येईल. ही कारवाई अंतिम इशारा असून, त्यानंतरही जर थकबाकीचा भरणा करण्यात आला नाही, तर संबंधित कार्यालयांचा वीजपुरवठा कोणतीही पूर्वसूचना न देता खंडित करण्यात येणार आहे.

# नांदगाव खंडेश्वर आयटीआयमध्ये तंत्रज्ञानाची रंगत

## ‘कांतारा’ मॉडेल ठरले आकर्षणाचे केंद्र



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४नांदगाव खंडेश्वर**


नांदगाव खंडेश्वर येथील एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे बुधवारी (ता. १४) आयोजित भव्य तंत्र प्रदर्शनीने विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, कौशल्य व नवकल्पनांचे दर्शन घडवले. आयटीआयचे प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे यांच्या उपस्थितीत व राजाभाऊ देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीकांत दांडगे यांच्या हस्ते रिबीन कापून या तंत्र प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रदर्शनीत विविध ट्रेडच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली उपयुक्त, नाविन्यपूर्ण व भविष्याभिमुख मॉडेल्स सादर करण्यात आली. विशेषतः बेसिक कॉस्मेटोलॉजी ट्रेडच्या ‘कांतारा’ या संकल्पनात्मक मॉडेलने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कल्पक मांडणी व सादरीकरणामुळे हे मॉडेल आकर्षणाचे केंद्र ठरले. प्रदर्शनीत वॉटर फाउंटन, बाईक इंडिकेटर, टेस्ला कॉइल, सीड्स क्लिनिंग मशीन, डिजिटल हार्ट पल्स व तापमान मीटर, पास प्रो सॉफ्टवेअर, वाहन अपघात नियंत्रण प्रकल्प, ऑटोमॅटिक नाईट सेन्सर, जलविद्युत प्रकल्प, पोर्टेबल शेगडी, शीट मेटल फोल्डिंग मशीन, मानवचलित पेरणी यंत्र, मेकॅनिकल वॉच यांसह फॅशन डिझाईन, वेल्डर ट्रेडची मॉडेल्स सादर करण्यात आली.या तंत्र प्रदर्शनीला डॉ. झाकीर हुसेन उर्दू जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी भेट देत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आयटीआयच्या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांमधून व्यावसायिक कौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि नवोपक्रमांची ताकद स्पष्टपणे दिसून आली. एकूणच, नांदगाव खंडेश्वर आयटीआयची ही तंत्र प्रदर्शनी विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासाला चालना देणारी, उद्योगाभिमुख शिक्षणाचे प्रभावी उदाहरण ठरली.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता आयटीआयचे शिल्पनिदेशक तुषार जैन, राजकुमार धोटे, प्रफुल्ल कचरे, वैभव जाधव, निलेश देऊळकर, राम इखार, शहजाद खान, सुशिल सरोदे, सागर डांगे, चिन्मय दहाट, वैभव केणे, प्रशांत पोच्ची, सचिन वाहणे, सचिन दुवदने, मयुरी वसुले, रूचिका डोरस, संगिता बिबेकर, दिपाली लोखंडे, रूपाली लांडे, सुरक्षारक्षक धिरज तायडे यांच्यासह प्रशिक्षणार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# तडीपार आरोपींना अटींवर मतदानाची मुभा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

निवडणूक प्रक्रियेत मतदानाचा हक्क हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार मानला जात असला, तरी कायद्याच्या कचाट्यात सापडलेल्या सर्वांनाच हा अधिकार मिळतो असे नाही. तडीपार आरोपी, स्थानबद्ध व्यक्ती, न्यायालयीन कोठडीत असलेले आरोपी आणि शिक्षा भोगणारे कैदी यांच्यासाठी मतदानासंदर्भात वेगवेगळे नियम लागू आहेत. काहींना ठरावीक अटींवर मतदानाची मुभा आहे, तर काहींना हा हक्कच नाकारण्यात आला आहे. विशेष म्हणजे, कैद्यांना निवडणूक लढवता येते; मात्र त्यांनाच मतदान करता येत नाही, ही बाब अनेकांसाठी आश्चर्याची ठरत आहे.मागील वर्षभरात जिल्ह्यातून ५० हून अधिक व्यक्तींना तडीपार करण्यात आले असून, त्यात विविध गंभीर गुन्ह्यांतील




आरोपींचा समावेश आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असताना, तडीपार आरोपींना मतदानाच्या दिवशी ठरावीक कालमर्यादेत आपल्या मतदारसंघात येऊन मतदान करण्याची परवानगी दिली जाते. मात्र यासाठी पोलीस प्रशासनाची पूर्वपरवानगी, ठरावीक वेळेत ये-जा आणि थेट मतदान केंद्रावर हजेरी लावणे या अटींचे पालन करणे बंधनकारक आहे.दरम्यान, स्थानबद्ध आरोपी तसेच न्यायालयीन कोठडीत असलेले आरोपी टपाली मतदानाद्वारे आपला मताधिकार बजावू शकतात. कायद्यानुसार शिक्षा झालेला कैदी, त्याच्यावर ठरावीक कालावधीची अपात्रता लागू नसेल तर निवडणूक लढवू शक्तो. मात्र कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांना मतदानाचा अधिकार नाही, हा स्पष्ट कायदेशीर नियम आहे.कैद्यांना मतदानाचा अधिकार नसला तरी त्यांना निवडणूक लढविता येते. आरोपीवरील गुन्हा सिद्ध झाल्याशिवाय त्याला गुन्हेगार मानता येत नाही. कैद्यांच्या मानवी हक्कांच्या दृष्टीने मतदानाच्या अधिकाराचे रक्षण होणे गरजेचे आहे. मात्र दोषी ठरलेले आणि गंभीर गुन्ह्यातील गुन्हेगार यांना मताधिकारापासून वगळणे योग्य ठरेल.

# शेतकऱ्यांना मोठा दिलासा; पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत राज्य सरकारने पीक कर्जासाठी लागणारे मुद्रांक शुल्क १ जानेवारीपासून पूर्णतः माफ केले आहे. या निर्णयामुळे कर्ज घेताना शेतकऱ्यांवर येणारा आर्थिक भार कमी होणार असून, कागदपत्रांची कटकटही संपणार आहे. मुद्रांक शुल्क माफीमुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचणार असून बँकिंग प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक होणार आहे.याआधी पीक कर्जाच्या दस्तऐवजांसाठी प्रतिलाख सुमारे ३०० रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. त्यामुळे दोन लाख रुपयांच्या कर्जासाठी शेतकऱ्यांना ६०० ते ७०० रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत होता. आता ही रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खिशात राहणार आहे.अल्पभूधारक शेतकऱ्यांना मोठा आधारया निर्णयाचा सर्वाधिक फायदा अल्पभूधारक व मध्यम शेतकऱ्यांना होणार आहे. खरीप



आणि रब्बी हंगामासाठी कर्ज घेताना होणारी आर्थिक ओढाताण काही प्रमाणात कमी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.कर्ज प्रक्रिया अधिक सुलभमुद्रांक शुल्क माफीमुळे कर्ज मंजुरीतील एक मोठा अडथळा दूर झाला आहे. याआधी मुद्रांक खरेदी, नोंदी आणि कायदेशीर प्रक्रिया यासाठी शेतकऱ्यांचा बराच वेळ जात होता. आता ही कटकट संपल्याने बँकांकडून कर्ज मिळण्याची प्रक्रिया अधिक जलद होणार आहे.‘या’ दस्तऐवजांवरील शुल्क माफपीक कर्ज प्रक्रियेदरम्यान लागणारे कर्ज करारनामा, जामीनपत्र, गहाणखत, प्रतिज्ञापत्रे व इतर पूरक कायदेशीर कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ करण्यात आले आहे.सर्व बँकांसाठी बंधनकारकहा निर्णय केवळ सरकारी बँकांपुरता मर्यादित नसून, राज्यातील सर्व राष्ट्रीयीकृत, खासगी, सहकारी बँका तसेच सर्व कर्जवाटप करणाऱ्या पतसंस्थांवर बंधनकारक करण्यात आला आहे.दोन लाखांपर्यंतच्या कर्जाला सवलतराज्य सरकारच्या निर्णयानुसार दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदत पीक कर्जाशी संबंधित सर्व दस्तऐवजांवर कोणतेही मुद्रांक शुल्क आकारले जाणार नाही. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना थेट लाभ होणार आहे.

# निवडणूक ड्युटीत पोलिसांची कसोटी; भत्ता मात्र किती?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती**

लोकशाहीच्या उत्सवात म्हणजेच निवडणुकीत पोलिसांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. शांततापूर्ण मतदान, कायदा-सुव्यवस्था आणि मतदारांची सुरक्षितता राखण्याची मोठी जबाबदारी खाकी वर्दीवर असते. भर उन्हात, पावसात तसेच दुर्गम आणि संवेदनशील भागात रात्रंदिवस बंदोबस्त करताना पोलिसांची अक्षरशः कसोटी लागते. या कामाच्या मोबदल्यात पोलिसांना निवडणूक आयोगाकडून ‘निवडणूक भत्ता’ दिला जातो.सध्या राज्यात महापालिका निवडणुकीची धामधूम सुरू असून, आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बंदोबस्त अधिक कडक करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने पोलिस दलातील विविध पदांसाठी भत्त्याचे स्पष्ट निकष ठरवले आहेत. यात



केवळ मतदानाचा दिवसच नव्हे, तर प्रशिक्षण, साहित्याची ने-आण आणि इतर निवडणूकपूर्व कामकाजाचे दिवसही गृहित धरले जातात.

**असा आहे निवडणूक भत्ता**

अधिकारी दर्जा : पोलिस उपनिरीक्षक व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांना प्रतिदिन ७५० ते १,२०० रुपये भत्ता.अंमलदार : पोलिस शिपाई ते हवालदार दर्जाच्या कर्मचाऱ्यांना दिवसाला ५०० ते ७०० रुपये मानधन.

होमगार्ड : पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या होमगार्ड जवानांना ४०० ते ६०० रुपये मानधन.

जेवणाची सोय की भोजन भत्ता?निवडणुकीच्या दिवशी अनेकदा पोलिसांना मतदान केंद्र सोडता येत नाही. अशा वेळी निवडणूक आयोगाकडून साधारण २०० रुपयांपर्यंत ‘भोजन भत्ता’ दिला जातो. काही ठिकाणी प्रशासनाकडून जेवणाची पाकिटे पुरवली जातात, तर काही जिल्ह्यांमध्ये हा भत्ता थेट रोख स्वरूपात मानधनासोबत दिला जातो.




# अमरावती महानगरपालिका मतदानासाठी प्रशासन सज्ज

## कडेकोट पोलीस बंदोबस्तात ईव्हीएम मशिन्स मतदान केंद्रांकडे रवाना







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

महानगरपालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असून आता सर्वांचे लक्ष उद्या होणाऱ्या मतदानाकडे लागले आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली आहे. अमरावती महानगरपालिकेच्या २२ प्रभागांतील ८७ जागांसाठी तब्बल ६६१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.आज सकाळपासूनच अमरावती शहरातील विविध वितरण केंद्रांवरून ईव्हीएम मशिन्स व निवडणूक साहित्य मतदान केंद्रांकडे रवाना





करण्यास सुरुवात झाली आहे. ही संपूर्ण प्रक्रिया कडेकोट पोलीस बंदोबस्तात व महसूल विभागाच्या देखरेखीखाली पार पडत आहे.शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी शहरात २ हजारांहून अधिक पोलीस कर्मचारी व होमगाड्र्सचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत असून, मतदान प्रक्रिया शांततापूर्ण व पारदर्शक पार पडावी यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे सांगण्यात आले आहे.

## अमरावती शहर गुन्हे शाखेची मोठी कारवाई; एम.डी. मॅफेडॉन विक्री करणाऱ्या आरोपीस अटक, सव्वा चार लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने अमरावती शहर गुन्हे शाखेने अवैधरित्या मॅथेडॉन (एम.डी.) या अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या इसमावर धडक कारवाई करत मोठे यश मिळविले आहे.मा. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने अवैध अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. त्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी



व अंमलदारांचे विशेष पथक कार्यरत होते. पथकाने गुप्त बातमीदार नेमून सातत्याने माहिती संकलन सुरू ठेवले होते.दि. १३ जानेवारी २०२६ रोजी गुन्हे शाखेचे पथक आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदाराकडून खात्रीलायक माहिती प्राप्त झाली. कोर्टाजवळील पोस्ट ऑफिस परिसरात एक इसम अवैधरित्या मॅथेडॉन (एम.डी.) नावाचा अंमली पदार्थ बाळगून विक्री करण्याच्या उद्देशाने येणार असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ नियोजन करून नमूद ठिकाणी सापळा रचला.व संशयित इसमास ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याचे नाव सलमान खॉ आमीर खाँ (वय २४ वर्षे), रा. इंदीरा नगर, हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला असे असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या अंगझडतीत ४८ ग्रॅम २१० मिलीग्रॅम मॅथेडॉन (एम.डी.) मॅफेडॉन पावडर मिळून आली. सदर अंमली पदार्थाची अंदाजे किंमत ४ लाख ४९ हजार २०० रुपये इतकी आहे.याशिवाय आरोपीकडून एक विवो कंपनीचा ऑरेंज रंगाचा मोबाईल फोन (किंमत अंदाजे १० हजार रुपये), इलेक्ट्रॉनिक वजन काटा व स्टीलचा चमचा (किंमत अंदाजे १ हजार १० रुपये) असा एकूण ४ लाख ६० हजार २१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त मुद्देमालाबाबत विचारणा केली असता आरोपीने सदर एम.डी. मॅफेडॉन हा अमरावती येथील 'मुज्जु' नावाच्या इसमाकडून घेतल्याची कबुली दिली. मात्र सदर इसम सध्या फरार असून त्याचा शोध गुन्हे शाखेकडून युद्धपातळीवर सुरू आहे.या प्रकरणी आरोपी सलमान खॉ आमीर खाँ याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे एन.डी.पी.एस. ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच फरार आरोपी मुज्जु यालाही आरोपी करण्यात आले असून त्याच्या अटकेसाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.सदर कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त शाम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय व गुन्हे) रमेश धुमाळ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि मनिष वाकोडे यांच्यासह पोलीस अंमलदार सतीश देशमुख, फिरोज खान, अजय मिश्रा, मंगेश लोखंडे, सुधीर गुडधे, सैयद नाझीम, अतुल संभे, रंजीत गावंडे, चेतन कराडे, प्रभास पोकळे व चेतन शर्मा यांनी यशस्वीपणे केली.

## चांदूर बाजार नगर परिषदेत प्रहार जनशक्ती पक्षाचा सत्तारूढ प्रारंभ

### खुर्चीऐवजी स्वच्छता व रक्तदानातून सत्तेचा पहिला दिवस साजरा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४चांदूर बाजार**

चांदूर बाजार येथे प्रहार जनशक्ती पक्षाला बहुमताचा स्पष्ट जनादेश प्राप्त झाल्याने, येथे राष्ट्र प्रथम प्रहार जनशक्ती पक्ष प्रणीत लोकशाही आघाडी या नावाने अधिकृत गट स्थापन करण्यात आला.नगर परिषदेच्या एकूण २१ सदस्यांपैकी नगराध्यक्ष सौ. मनीषा मनीष नांगलिया यांच्यासह १६ नगरसेवकांचा गट तयार करण्यात आला असून,गटनेता : सचिन खुळेस्वीकृत नगरसेवक : अजय मलिये व शेख नजीम (प्रिन्स)उपाध्यक्ष : शेख रहमान शेख इब्राहिमयांची सर्वानुमते निवड करण्यात आली.सत्तेतील पहिल्याच दिवशी खुर्चीवर बसून कारभार सुरू करण्याऐवजी,मा. ना. बच्चूभाऊ कडू यांच्या प्रमुख उपस्थितीतनगर स्वच्छता व सामाजिक उपक्रमातून सत्तेचा नवा आदर्श प्रहार जनशक्ती पक्षाने घालून दिला.याअंतर्गत गाडगेबाबा मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा,तेथून बेलोरा ऑटो चौक – किसान पुतळा – जयस्तंभ चौक – नेताजी चौक – गांधी चौक असा संपूर्ण शहरात भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आला.यानंतर मोठ्या प्रमाणावर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये चांदूर बाजार शहरातील तरुण, युवा व महिला मंडळींनी उत्स्फूर्त सहभाग घेत मोठ्या संख्येने रक्तदान केले.या वेळी सचिन खुळे, हेमंत कोंडे, अबुदादा वानखडे, एजाज भाई, तनवीर ताज, रहमान भाई, हाजी सोहेल, मुजफ्फर हुसेन, जमील आफताब सर, ड. आबिद हुसेन, जमील अहमद, गोपाल वानखडे, घनश्याम उसरबरसे, विनोद कोरडे, मनीष नांगलियायांची प्रमुख उपस्थिती होती.तसेचप्रहार तालुका प्रमुख प्रदीप बंड, संजय गोमकाळे,प्रहार महिला आघाडी विदर्भ प्रमुख स्टेला मॅडम,जिल्हा पदाधिकारी लीना गुडघेयांनी या उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.या भव्य, नावीन्यपूर्ण व लोकाभिमुख प्रयोगामुळेचांदूर बाजारच्या जनतेनेअसाच कारभार अपेक्षित होताअशी भावना व्यक्त करतमा. बच्चूभाऊ कडू व त्यांच्या संपूर्ण टीमला बहुमत दिल्याचे समाधान व विश्वास व्यक्त केला आहे.

## पंचवटी चौकात कांदा भरलेला ट्रक पलटी पहाटेची वेळ असल्याने मोठा अनर्थ टळला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४तिवसा**

वरनगांव (भुसावळ) मार्गावरून येणारा थइ २३ ए ६५३३ क्रमांकाचा ट्रक दि. १४ रोजी पहाटे साडेचार वाजताच्या सुमारास तिवसा शहरातील पंचवटी चौकात तांत्रिक बिघाडामुळे चालकाचे नियंत्रण सुटून पलटी झाल्याची घटना घडली. सदर ट्रक भुसावळ येथून कलकत्त्याकडे कांदा घेऊन जात होता.

पंचवटी चौक परिसरात दिवसभर विद्यार्थ्यांची वर्दळ, नागरिक, वयोवृद्ध तसेच गड्यांचे बसस्थानक असल्यामुळे नेहमीच मोठी गर्दी असते. मात्र ही घटना पहाटे साडेचारच्या सुमारास घडल्यामुळे त्या वेळी नागरिकांची वर्दळ नसल्याने मोठा अनर्थ टळला. ट्रक पलटी झाल्याने कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून काही काळ वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक तिवसा पोलीस स्टेशन कर्मचारी व नागरिकांनी तत्परतेने घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी मदत केली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. नागरिकांनी सुरक्षित अंतर ठेवून वाहन चालवावे तसेच अवजड वाहनांची वेळोवेळी तांत्रिक तपासणी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे घटनेमुळे पंचवटी चौकातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा आला आहे.

## मतदान केंद्रावर चक्कर आली तर काय? मदतीसाठी तैनात राहणार आरोग्य कर्मचारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

महापालिका निवडणूक तसेच मतमोजणीच्या काळात मतदान केंद्रावर कर्मचारी, अधिकारी किंवा मतदारांची प्रकृती अचानक बिघडल्यास तातडीची वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी आरोग्य विभाग सज्ज झाला आहे. विशेषतः वयोवृद्ध, आजारी नागरिक, गरोदर महिला व दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रांवर विशेष आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.मतदान व मतमोजणीदरम्यान रक्तदाब वाढणे, चक्कर येणे, अशक्तपणा जाणवणे अशा तक्रारी उद्भवू शकतात. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाने वैद्यकीय पथके व रुग्णवाहिका तैनात केल्या आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर प्रथमोपचार पेटी तसेच आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध राहणार आहे.मतमोजणी केंद्रावरही वैद्यकीय पथके कार्यरत ठेवण्यात येणार असून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाला तत्काळ नजीकच्या रुग्णालयात हलविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. डॉक्टर, नर्स, आरोग्य सेवक व वाहनचालक अशा कर्मचाऱ्यांची निवडणूक काळात विशेष नियुक्ती करण्यात आली आहे.प्रत्येक महत्त्वाच्या मतदान केंद्रावर डॉक्टर, नर्स व आरोग्य सेवकांचा समावेश असलेले वैद्यकीय पथक तैनात राहणार आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत व सुरक्षित पार पडावी यासाठी आरोग्य विभाग व निवडणूक प्रशासनामध्ये समन्वय ठेवण्यात आला आहे.मतदान किंवा मतमोजणीदरम्यान एखादा मतदार किंवा कर्मचारी बेशुद्ध पडल्यास तातडीने प्रथमोपचार दिले जातील. गरज भासल्यास रुग्णवाहिकेद्वारे रुग्णालयात हलविण्यात येणार आहे. प्रत्येक केंद्रावर बीपी मशीन, साखर तपासणी साहित्य, आवश्यक औषधे व प्राथमिक उपचार साहित्य उपलब्ध असेल.शहरातील विविध मतदान केंद्रे तसेच मतमोजणी केंद्रांवर रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात येणार असून आपत्कालीन परिस्थितीत त्वरित सेवा दिली जाणार आहे.

## चारही उमेदवाराला मतदान केल्यानंतरच ठरणार मतदान वैध; नाहीतर मत ठरणार अवैध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

महापालिकेची निवडणूक १५ जानेवारी रोजी आहे. यात २२ प्रभागांतील ८७ जागांसाठी ६६१ उमेदवार रिंगणात आहेत. यातील प्रभाग क्रमांक १ ते ८ आणि १० ते २२ मध्ये प्रत्येकी चार उमेदवारांना मतदान करायचे आहे, तर प्रभाग ९ वडाळी एसआरपीएफमध्ये केवळ तीन उमेदवारांना मतदान करायचे आहे. एका बॅलेट युनिटवर १४ उमेदवार व १५ क्रमांक नोटाचा राहणार आहे.

त्यामुळे प्रभागातील उमेदवारांच्या संख्येनुसार बॅलेट युनिट असतील. सर्वच प्रभागांतील उमेदवारांची एकूण संख्या १६ पेक्षा अधिक असल्याने दोन बॅलेट युनिट राहतील. तर ज्या प्रभागातील उमेदवारांची संख्या ही २८ पेक्षा जास्त असेल, अशा प्रभागात फक्त तीन बैलेट युनिटवरच मतदारांना मतदान करावे लागणार आहे.

**मतदान वैध व अवैध कसे ठरणार?**

एका मतदाराला चार उमेदवारांना मतदान करावे लागणार आहे. याचा अर्थ असा की तुम्हाला ईव्हीएमवर चार वेळा बटन दाबावे लागेल. ही चारही मते देणे बंधनकारक आहे. जर तुम्ही चारपैकी एखादं मत दिलं नाही, तर तुमचं संपूर्ण मतदान अवैध ठरू शकते.

**दोन किंवा तीन उमेदवारांनाच मतदान केले तर?**

मतदाराला चार उमेदवारांना मतदान करावयाचे आहे. एखाद्या मतदाराने दोन किंवा तीन उमेदवारांना मतदान केले व तिसऱ्या किंवा चौथ्या उमेदवाराला मतदान केले नाही. तसेच नोटा बटन न दाबल्यास मतदानाची प्रक्रिया पूर्ण होणार नाही.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत